# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. स्थायी समिती सभा दि. ०१/०३/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०१/०३/२०११ रोजी सभा सुचना क्र. १७ दि. २३/०२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| ६. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ७. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ८. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ९. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| १०. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ११. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| १२. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १३. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |
| १४. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १५ | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |

**मा. सभापती :-**

सचिवांनी सभेच्या कामकाजाला सुरुवात करावी

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा मंगळवार दि. ०१/०३/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. १७, दि. २३/०२/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र. १२१, दि. ०७/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**भगवती शर्मा :-**

दि. ०७/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**शशिकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे. तत्पूर्वी मी मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब ठराव क्र. २८, प्रकरण क्र. ३३ आपण प्लास्टीकच्या पिशव्यांवर बंदीचा ठराव केलेला आहे आणि तो मंजुर झालेला आहे. परंतु, प्लास्टीक पिशव्या बंद होण्यासाठी आपण काय उपाययोजना केली? त्याबद्दल निवेदन केले तर बरे होईल.

**राजकुमार कांबळे :-**

मा. सभापती साहेबांच्या तसेच आयुक्त साहेबांच्या परवानगीने बोलतो. यापुढे आम्ही सर्व एस.आय., मुकादम यांच्यासोबत एक मोहिम आखु आणि त्यांच्या थ्रु जेवढ्या २० मायक्रो पेक्षा कमी असेल त्या पिशव्या जप्त करण्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, पण हा विषय ७ जुलैला झालेला आहे. आज आपल्याला कमीत कमी ८ ते ९ महिने लोटले गेलेले आहे. मग पुढची कारवाई कशी होणार?

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. या ठरावाच्या अंमलबजावणीसाठी त्यांना निलंबित केले होते. माझ्या निदर्शणास पण आणले नाही. आता इथून पुढे मुकादम आणि एस.आय. यांना अधिकार देवून प्रत्येक दुकान छाननी करुन निल केलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, माझी आयुक्तांना विनंती आहे की, आमच्या सभागृहात सदस्य बरेच ठराव करतात त्याच्यावर अंमलबजावणी लवकरात लवकर तातडीने व्हावी. त्या ठरावाचे काहीतरी चिज झाले असे आमच्या निदर्शणास येईल आणि त्याचा फायदा नागरीकांना झाला पाहिजे. आता पूर परिस्थितीत प्लास्टीकच्या परिस्थितीत येते. प्लास्टीकच्या थैल्या जावून कुठेतरी अडकतात त्यामुळे पाण्याचा प्रवाह बंद होतो. अशा अनेक अडचणी येतात. तर त्यानंतर आपण लागलीच अंमलबजावणी केली तर येणारे जे संकट आहे ते टाळता येतील.

**प्रकरण क्र. १२१ :-**

दि. ०७/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १११ :-**

दि. ०७/०७/२०१० रोजीच्या मा. स्थायी समिती इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. शशिकांत भोईर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२२, पुर्नविनियोजन मंजूरी मिळणेबाबत. (आरोग्य विभाग)

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मधे पण पुर्नविनियोजनचे बरेच प्रस्ताव येतात. आपण गेल्या वर्षी बजेटमध्ये तरतुद केलेली आहे. तर अशी घट का येते? आता आपल्याला पण अंदाज येत असेल ना की, एवढे फवारणीला लागतात. आपण ४१ लाख रु. त्याला पुर्नविनियोजनला देत आहोत.

**भगवती शर्मा :-**

और सबसे बडी चिज यह है की, जिस दवॉ के बिल हम कर रहे है आज मुझे लगता है की कोई सदस्य संतृष्ट नही होंगे की दवाई की फवारणी बराबर नही है।

**शशिकांत भोईर :-**

टेम्पो पण कुठे चालु झालेला आहे? टेम्पो पण फवारणीसाठी आमच्या परिसरात आलेले नाहीत.

**भगवती शर्मा :-**

अभी चार दिन पहले प्रभाग समिती की मिटींग हुई थी उसमे भी यह चर्चा हुआ। लेकीन वह जाकर ४ दिन हो गया उसके बावजुद भी दवॉ फवारणी का व्यवस्था नही है। साहब, सभा के अंदर एक मुद्दा उठाया गया था की, आपके प्रत्येक वॉर्ड के अंदर धुवॉ फवारणी की मशिन कितनी दी गई है? तो विभागीय पाच प्रभाग के बिच अंदर १ मशिन दी गयी है। लेकीन वस्तुस्थिती यह है की कोई भी आपकी मशिन सही नही है। तो कितने दिन तक सही नही है? तब यह पता चला की, रिपेअरिंग के लिए कंपनी से आदमी को बुलाया गया। आजतक वह रिपेअरिंग हुई की नही? मतलब पिछले दो महिनो से फवारणी हुई नही।

**शशिकांत भोईर :-**

मा. आयुक्त साहेब, यापूर्वी आपण रिक्षा घेतलेल्या त्या रिक्षापण कुठे आहेत माहित नाही. तो खर्च आपल्या पालिकेवरच पडला. म्हणजे नागरीकांना त्याचा जो लाभ घ्यायचा होता. मच्छर मलेरिया पासून तो घेता पण नाही आला. त्या रिक्षा बंद केल्या आणि आता टेम्पो आणले. म्हणजे काय प्रकार नविन नविन येतील सर्वांना मंजूरी देत चालले की, आपण पुर्नविनियोजन करायचे. आज आपल्याला ह्याच्यामध्ये घट होणार. जो आपला बजेट आहे तो टॅक्सचा भाव वाढला नाही. त्यामुळे आपल्याला घट येणारच आहे. त्याच्यामध्ये ह्या वाढीवला दुसरी मंजुरी देतो.

**मा. आयुक्त :-**

पाठीमागच्या वर्षी जे औषध खरेदी केले त्याचे रि-ॲप्रोप्रिएशन आहे. आता जे अधिकारी मारणार होते ते रजेवर आहेत. कारण मुकादमा कडून ती व्यवस्था होती. आता ते निलंबित झालेले आहेत. आता त्यांना २ दिवसांपूर्वी घेतले. ते माहिती घेऊन पुढच्या सभेमध्ये सविस्तर माहिती देतील.

**चंद्रकांत म्हात्रे :-**

साहेब जे टेम्पोद्वारे औषधाची फवारणी होते ती फवारणी करतच नाही. कारण ती क्वचित बघायला मिळते. हाताने जी गटारामध्ये फवारणी होते ती व्यवस्थित होत नाही. ते टेम्पोद्वारे संपूर्ण शहरामध्ये गटारामध्ये फवारणी केली तर चांगले होईल. कारण ती व्यवस्थित होते.

**मा. आयुक्त :-**

त्या एरियात जे खैरे होते. ते आज रजेवर आहेत.

**स्नेहा पांडे :-**

साहब, पुरे साल की यह स्थिती है। एक दो महिने की स्थिती नही है।

**भगवती शर्मा :-**

अजुनपर्यंत कारवाई काय केली?

**चंद्रकांत मोदी :-**

साहब, पहले जो बंधक पानी मे दवॉई छोडते थे ना तो उसे मच्छर कम होता था।

**भगवती शर्मा :-**

त्यांच्याकडे सगळे नोट्स आहेत. कुठल्या कुठल्या वॉर्डमध्ये कोणाची काय काय तक्रार होती.

**मा. आयुक्त :-**

पुढच्या मिटींगमध्ये सविस्तर सांगतो. आज मी सभागृहाचे मत जाणून घेतले. मी शोकॉस नोटीस देतो आणि कुठल्या कुठल्या वॉर्डात केव्हा केव्हा मारलेले आहे आणि कोणा कोणाच्या सह्या घेतलेल्या आहेत? त्याच पुढच्या वेळेला सादरीकरण करु.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. याच्यामध्ये असे आहे की, ज्या पध्दतीने शहरामध्ये जे मच्छर आहे तर ह्या फवारणीने त्याच्यावर फार फरक पडेल असे नाही. त्याच्या पलिकडे जावून आपल्याला ज्या ज्या ठिकाणी पाणी साचून राहते. काही प्लॉटमध्ये गवत आणि पाणी आहे अशा ठिकाणी मच्छर त्या ठिकाणी कुठल्या प्रकारची फवारणी होत नाही असे शहरामधले प्लॉट आहेत ना. जिथे लोक वस्ती आहे. त्या ठिकाणचे खास करून त्या-त्या जमिनीच्या मालकांना अन्यथा आपल्या माध्यमातुन सध्या शहरामध्ये माती पुष्कळ येते. लोकांना माती टाकण्यासाठी जागा नाही. मग, अशा ठिकाणचा जर कमीत कमी लेवल करून घेतल तर चांगल राहिल. त्यांनी मच्छरचा फरक पडेल.

**मा. आयुक्त :-**

ते आणि सेफ्टिक टॅंक.

**लक्ष्मण जंगम :-**

हो. आणि मध्ये जे मागच्या वेळेला सेफ्टिक टॅंक आणि गटारामध्ये सोडत होते ते तेला सारख औषध त्याने फरक पडत होता. पण यावर्षी मच्छरच्या बाबतीत जरा सुध्दा फरक नाही. खुप मच्छर आहे.

**मा. आयुक्त :-**

मागच्या वर्षी मलेरिया ऑईल टाकल होत. १-१ लिटर प्रत्येक सेफ्टिक टॅंकमध्ये. या वेळेला ही टाकायला सुरूवात करतो.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब, टॅक्स नही बढनेसे अपना बजट मे इन्कम मे फरक पडा है। और खर्च हमलोग जितना दिखाये ये इन्कम उसी हिसाब से खर्च रखा थआ। तो अगर इन्कम कम हुआ है तो खर्च हमारा ऑलरेडी ज्यादा है। बजट डेफिसिट मे जा रहा है और हेड मे तरतुद कर रहे है। बढा के दे रहे है। तो औप इसको कवर करेंगे?

**मा. आयुक्त :-**

यह पिछले साल का है। पिछले साल का रिअप्रोप्रिएशन का है। जो हेड के उपर खर्चा हुआ नही वह हेड इधर ट्रान्सफर कर रहे है। इसका मतलब यह नही की कुछ टॅक्स बढा नही टॅक्स कम हुआ। इसका मतलब यह नही की पहले जो हम करते थे वही कर रहे है। लेकिन दवाई का खर्चा बढ गया इसलिए वह ज्यादा रिअप्रोप्रिएशन कर रह है। जिस हेड हमने खर्चा नही किया वही हेड ट्रान्सफर कर रहे है।

**स्नेहा पांडे :-**

ऐसा हम कर सकते है क्या? दुसरे हेड का दुसरे मे।

**मा. आयुक्त :-**

इसलिए तो सब्जेक्ट रखा ना।

**स्नेहा पांडे :-**

सेम हेड रहेगा तो कर सकते है। यहा वाहन दुरूस्ती बता रहे है तो यह ३० लाख रू. क्या सिर्फ आरोग्य की वाहन दुरूस्ती के लिए है क्या।

**मा. आयुक्त :-**

वाहन दुरूस्ती आरोग्य की।

**स्नेहा पांडे :-**

सिर्फ आरोग्य का? टेम्पो नाही काही नाही तर मग कस काय? अपना टेम्पो चालू नही है। तो आरोग्य के पास कितने वाहन है? की, ३० लाख रू. नोव्हेंबर तक खर्च हुआ। और अब बढाके मांगना पड रहा है। आरोग्य डिपार्टमेंट ने कितनी गाडीया है?

**राजकुमार कांबळे :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो, १ जेसीपी आहे. ४ डंम्पर आहेत. आणि जे फॉगिंग मशिन असते त्याला डिझेल आणि पेट्रोल मोठ्या प्रमाणात लागत असते. त्यामुळे ही तरतुद करण्यात आलेली आहे.

**स्नेहा पांडे :-**

आरोग्य के वाहन अलग रखा जाता है क्या? सारे वाहन दुरूस्ती एकसाथ होता है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आरोग्य का अलग है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

वाहना बद्दल जरा सांगा, आणि फवारणी बद्दल पण सांगा.

**राजकुमार कांबळे :-**

मी माहिती घेवुन सांगतो. कारण मी आजच आलेले आहे.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी लागणारी डास नाशके, डास अळी नाशके, धुकीकरण करणे कामी औषधे खरेदी करणे कामी तसेच शहरात धुर फवारणी करणे कामी लागणारे पेट्रोल "आरोग्य पेट्रोल/वाहन दुरुस्ती खर्च" या लेखाशिर्षातुन सदरची तरतुद अपुरी पडत आहे. याकामी खालील नमुना क्र. १० नियम ३० (३) नुसार पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

| क्र. | लेखाशिर्ष आरोग्य साफसफाई व सोयी | उपलब्ध शिल्लक | लेखाशिर्ष आरोग्य साफसफाई व सोयी | प्रस्तावित वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कचरा सपाटीकरण / माती भराव | रु. १९,००,०००/- | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | रु. २६,००,०००/- |
| २ | संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान बक्षीस / छपाई | रु. ७,००,०००/- | | |
| ३ | प्रभाग साफसफाई / नाले सफाई / खोदाई करणे. | रु. १५,००,०००/- | आरोग्य पेट्रोल / वाहन दुरुस्ती खर्च | १५,००,०००/- |
| | **एकूण उपलब्ध शिल्लक** | **रु. ४१,००,०००/-** | **प्रस्तावित वाढीव खर्च** | **रु. ४१,००,०००/-** |

वरीलप्रमाणे उपलब्ध असलेली लेखाशिर्षातील शिल्लक प्रस्तावित वाढीव खर्च, करावयाच्या रक्कमेसाठी वर नमुद केलेल्या लेखाशिर्षात वर्ग करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

सदर ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**स्नेहा पांडे :-**

कमिशनर साहब, नव्हंबर तक हमने इतना खर्च किया है की, तो आगे के ३ महिने मे कैसे क्या किया है? यह इसका पेमेन्ट आपने किया है या करना बाकी है?

**मा. आयुक्त :-**

रिअप्रोप्रिएशन होने के बाद करता है। अभी पेन्डींग रखा इसलिए तो रिअप्रोप्रिएशन के लिए सामने आया है ना।

**रामनारायण दुबे :-**

मा. आयुक्त साहब, यह विषय मा. महासभा से पास होता है। तो मा. महासभा का विषय को स्टॅण्डींग मे कैसे मंजुर हो सकता है? मा. महासभा का विषय है तो मा. महासभा से ही दि मंजुरी जायेगी ना?

**स्नेहा पांडे :-**

बॉडी से पास किया हुआ तरतुद अगर उसमे फेरबदल कर रहे है तो उसे मा. महासभा के सामने लाना चाहिए।

**मा. आयुक्त :-**

जरूरत नही है। स्टॅण्डींग कमिटी कॉम्पीटन्ट है इसलिए तो सबजेक्ट लाया ना।

**रामानारायण दुबे :-**

मा. महासभा का विषय है ना तो मा. महासभा को ही अधिकार है ना।

**मा. आयुक्त :-**

मा. महासभेने स्टॅण्डींग कमिटीको ५० लाख रू. तक अधिकार दिये है।

**मा. सभापती :-**

स्टॅण्डींग ला अधिकार आहे म्हणुन घेतलेला आहे.

**प्रकरण क्र. १२२ :-**

पुर्नविनियोजन मंजूरी मिळणेबाबत. (आरोग्य विभाग)

**ठराव क्रं. ११२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी लागणारी डास नाशके, डास अळी नाशके, धुकीकरण करणे कामी औषधे खरेदी करणे कामी तसेच शहरात धुर फवारणी करणे कामी लागणारे

पेट्रोल "आरोग्य पेट्रोल/वाहन दुरुस्ती खर्च" या लेखाशिर्षातुन सदरची तरतुद अपुरी पडत आहे. याकामी खालील नमुना क्र. १० नियम ३० (३) नुसार पुर्नविनियोजन करणे आवश्यक आहे.

| क्र. | लेखाशिर्ष आरोग्य साफसफाई व सोयी | उपलब्ध शिल्लक | लेखाशिर्ष आरोग्य साफसफाई व सोयी | प्रस्तावित वाढीची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | कचरा सपाटीकरण / माती भराव | रु. १९,००,०००/- | एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम | रु. २६,००,०००/- |
| २ | संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियान बक्षीस / छपाई | रु. ७,००,०००/- | | |
| ३ | प्रभाग साफसफाई / नाले सफाई / खोदाई करणे. | रु. १५,००,०००/- | आरोग्य पेट्रोल / वाहन दुरुस्ती खर्च | १५,००,०००/- |
| | **एकूण उपलब्ध शिल्लक** | **रु. ४१,००,०००/-** | **प्रस्तावित वाढीव खर्च** | **रु. ४१,००,०००/-** |

वरीलप्रमाणे उपलब्ध असलेली लेखाशिर्षातील शिल्लक प्रस्तावित वाढीव खर्च, करावयाच्या रक्कमेसाठी वर नमुद केलेल्या लेखाशिर्षात वर्ग करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्रं. १२३, हॉटेल, बार व रेस्टॉरन्टच्या परवाना दराबाबत फेरविचार करणे.

**भगवती शर्मा :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध व्यवसाय / उद्योग / आस्थापना करीता परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८, दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजूर केलेले आहेत. याबाबतीत महापालिका क्षेत्रातील हॉटेल, बार, व रेस्टॉरंट असोसिएशनचे पदाधिकारी यांनी दि. १५/१०/२०१० रोजी महापालिकेस निवेदन दिले असून निश्चित केलेले दर इतर महापालिकेच्या दरापेक्षा जास्त आहेत व ते कमी करण्याची विनंती त्यांनी केली आहे. याबाबत इतर महापालिकेचे दर मागविले आहेत. इतर महापालिकेच्या तुलनेत आपल्या महापालिकेचे परवाना शुल्क जास्त आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सुधारीत परवाना शुल्क खालील तक्त्याप्रमाणे करण्यात येत आहेत.

| **सध्याचे दर** | | | **सुधारीत दर** | | |
|---|---|---|---|---|---|
| परवाना व्यवसाय | सध्याचे शुल्क | नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु. | परवाना व्यवसाय क्षेत्रफळ | नविन शुल्क रु. | नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु. |
| बार ॲन्ड रेस्टॉरन्ट | १५०००/- | ७५००/- | १ ते २० चौ.मिटरपर्यंत | ५००/- | २५०/- |
| ५००० चौ. फुटापेक्षा जास्त क्षेत्र असलेले बार ॲन्ड रेस्टॉरन्ट | ३००००/- | १५०००/- | २० ते ५० चौ. मिटरपर्यंत | ७५०/- | ३२५/- |
| उपहार गृहे, चायनीज सेंटर | ५०००/- | २५००/- | ५० ते १०० चौ. मिटरपर्यंत | १०००/- | ५००/- |
| ५०० चौ. फुटपर्यंत हॉटेल | ३०००/- | १५००/- | १०० ते १५० चौ. मिटरपर्यंत | १५००/- | ७५०/- |
| ५०१ चौ. फुट पुढील क्षेत्राकरीता हॉटेल | ५०००/- | २५००/- | १५० चौ. मिटरपुढे प्रत्येक ५० चौ.मि. क्षेत्रफळास ५५० अधिक फी आकारावी जास्तीत जास्त फी. | १००००/- | |

वरील प्रमाणे सुधारीत परवाना शुल्क आकारणेस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत असुन मा. महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेस मान्यता देत आहे.

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब, इस विषय को, मा. महासभा मे पास किया गया था। सभी कारखानदारोको सभी व्यवसायदारोको रेट लगाया था। अगर फेरविचार करना है तो सभी के बारे मे फेर विचार किया जाये ना। बार

रेस्टॉरन्ट, लॉज , इललिगल है। उनका अपने एम.बी.एम.सी. को साफसफाई का भी ज्यादा भार पडता है। उनके बारे मे ही फेरविचार सोच किया जा रहा है। मै चाहती हु की जो भी ज्यादा रेट लगे है, जैसे ज्वेलर्स है अभी ज्वेलर्स का अपने के ज्यादा साफसफाई का कुछ भी नही है।

**मा. सभापती :-**

उसके अंदर सब दिया है। क्या है? क्यो लेकर आये?

**स्नेहा पांडे :-**

मे ऐसी सुचना मांडणी चाहती हुँ की, ................

**मा. सभापती :-**

दुसरे कल्याण डोंबवली का क्या है, कॉर्पोरेशन का क्या है। उनका रेट देखो ना। उस हिसाब से लाया है ना।

**स्नेहा पांडे :-**

सिर्फ बार और लॉज का ही रेट है ना। बाकी सभी चिजो का जैसे ज्वेलर्स हो गया, दुसरे कारखानदार हो गये। सभी का लाना था ना।

**भगवती शर्मा :-**

जिन्होने शुरूसे मांगनी की थी की, हमारी रेट दुसरे तुलनात्मक मे बहोत ज्योदा है। २०० टाईम ज्यादा है। उन्होने। उन्होने मांगनी की थी उसके आधार के उपर निवेदन लाया गया है। और उसको इस सभा ने मंजुरी दि है।

**स्नेहा पांडे :-**

जभी मा. महासभेमे विषय आया था तभी हम चिल्ला रहे थे। और हमारे साथ आप भी चिल्ला रहे थे।

**भगवती शर्मा :-**

अभी भी चिल्ला रहा हूँ।

**स्नेहा पांडे :-**

इसिलिए बोल रही हूँ की, सभी चिजों का एकसाथ किया जाये ना। कम रेट करने मे हमारा कोई विरोध नही है। कम होना चाहिए लेकीन सिर्फ उनके लिए क्यो?

**भगवती शर्मा :-**

जिसका निवेदन है उसे मंजूरी दी।

**स्नेहा पांडे :-**

गोल्ड की दुकान है उसके लिए अपने को क्या करना पाता है। उनको भी १०-१० हजार रुपये रेट हमने लगाया है। तो बारवाले इतना कमा रहे है।

**मा. सभापती :-**

ठिक है, हम उसके बारे मे सोचेंगे।

**स्नेहा पांडे :-**

ऐसा फेर-विचार करके लाईए।

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, माझी विनंती आहे. आपल्या ठरावामध्ये नमुद केलेलं आहे की, सदरचा प्रस्ताव मा. महासभेपूढे घ्यावा. म्हणजे मा. महासभेमध्ये चर्चा होवू शकते कमी करायचं की, जास्त करायचं?

**स्नेहा पांडे :-**

मा. महासभा मे सभी चिजों पर विचार करके लाईए ऐसी मेरी सुचना है।

**शशिकांत भोईर :-**

मा. महासभा मे विचार करके लाईए। अभी शिफारस कर रहे है। यह धोरण है। यह धोरण होने के कारण मा. महासभा मे ही जाएगा। हम लोग इसमे कुछ नही करनेवाले हमारा विरोध नही है। हा विषय मा. महासभेपूढे घ्यावा. त्याच्या ठरावाला अनुमोदन मी देतो.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहब, आपके परवानगी से बोलता हूँ। मेरे पास एक विषय है, जय अंबेनगर झोपडपट्टी के अंदर मे जब की झोपडपट्टी मे नाम ट्रान्सफर नही होता है, टॅक्स ट्रान्सफर नही होता है। मेरे पास ऐसे दो केस है। उनका टॅक्स पावती, पुराना रजिस्टर नं. है। एक मालमत्ता नं. सी/०१०००३९३५०० यह जो मुन्सीपाल्टी डीमांड रजिस्टर २००९ का है उसमे जोगीलाल माता प्रसाद गुप्ता के नाम से नोंदणी है। और अभी वर्तमान के अंदर २०१०-११ के अंदर मे टॅक्स भराया उसके अंदर महानगरपालिका द्वारा रीसीप्ट दि गई है। संतोष गंगाराम छत्तीस इस नामसे दि है। उसका यह पुरावा मेरे पास जो टॅक्स का पावती है। पुराना रजिस्टर है। यह रजिस्टर का पान क्र.१७२ मे पुराना नाम है। यह जिस व्यक्तीयों ने किया है। जो परसेजर है सेलर है प्लस इसके अंदर जो भी अधिकारी है। उन तिन्हो के उपर कारवाई करने का आदेश दिजिए।

**मा. सभापती :-**

त्या तिघांवर कारवाई झाली पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

दुसरा प्रकरण है वह भी जय अंबे नगर का है। अनुसुया रुदाल के नाम से पेज क्र.१८० पे है। और अभी वर्तमान के अंदर मोहम्मद जुगार आलम के नाम से है। इसके भी मे पुरावा देता हूॅ। आपसे निवेदन है की, इन सभी के उपर कानुनी कारवाई की जाए।

**मा. सभापती :-**

मा. आयुक्त साहेब, सगळ्यांवर कारवाई झाली पाहिजे.

**प्रकरण क्र.१२३ :-**

हॉटेल, बार व रेस्टॉरन्टच्या परवाना दराबाबत फेरविचार करणे.

**ठराव क्र. ११३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात विविध व्यवसाय / उद्योग / आस्थापना करीता परवाना शुल्काचे दर मा. महासभा ठराव क्र. ४८, दि. १०/१०/२००८ अन्वये निश्चित करुन मंजूर केलेले आहेत. याबाबतीत महापालिका क्षेत्रातील हॉटेल, बार, व रेस्टॉरंट असोसिएशनचे पदाधिकारी यांनी दि. १५/१०/२०१० रोजी महापालिकेस निवेदन दिले असून निश्चित केलेले दर इतर महापालिकेच्या दरापेक्षा जास्त आहेत व ते कमी करण्याची विनंती त्यांनी केली आहे. याबाबत इतर महापालिकेचे दर मागविले आहेत. इतर महापालिकेच्या तुलनेत आपल्या महापालिकेचे परवाना शुल्क जास्त आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सुधारीत परवाना शुल्क खालील तक्त्याप्रमाणे करण्यात येत आहेत.

| **सध्याचे दर** | | | **सुधारीत दर** | | |
|---|---|---|---|---|---|
| परवाना व्यवसाय | सध्याचे शुल्क | नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु. | परवाना व्यवसाय क्षेत्रफळ | नविन शुल्क रु. | नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु. |
| बार ॲन्ड रेस्टॉरन्ट | १५०००/- | ७५००/- | १ ते २० चौ.मिटरपर्यंत | ५००/- | २५०/- |
| ५००० चौ. फुटापेक्षा जास्त क्षेत्र असलेले बार ॲन्ड रेस्टॉरन्ट | ३००००/- | १५०००/- | २० ते ५० चौ. मिटरपर्यंत | ७५०/- | ३२५/- |
| उपहार गृहे, चायनीज सेंटर | ५०००/- | २५००/- | ५० ते १०० चौ. मिटरपर्यंत | १०००/- | ५००/- |
| ५०० चौ. फुटपर्यंत हॉटेल | ३०००/- | १५००/- | १०० ते १५० चौ. मिटरपर्यंत | १५००/- | ७५०/- |
| ५०१ चौ. फुट पुढील क्षेत्राकरीता हॉटेल | ५०००/- | २५००/- | १५० चौ. मिटरपुढे प्रत्येक ५० चौ.मि. क्षेत्रफळास ५५० अधिक फी आकारावी जास्तीत जास्त फी. | १००००/- | |


| **सध्याचे दर** | | | **सुधारीत दर** | | |
|---|---|---|---|---|---|
| परवाना व्यवसाय | सध्याचे शुल्क | नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु. | परवाना व्यवसाय क्षेत्रफळ | नविन शुल्क रु. | नुतनीकरण १ वर्षाकरिता शुल्क रु. |
| बार ॲन्ड रेस्टॉरन्ट | १५०००/- | ७५००/- | १ ते २० चौ.मिटरपर्यंत | ५००/- | २५०/- |
| ५००० चौ. फुटापेक्षा जास्त क्षेत्र असलेले बार ॲन्ड रेस्टॉरन्ट | ३००००/- | १५०००/- | २० ते ५० चौ. मिटरपर्यंत | ७५०/- | ३२५/- |
| उपहार गृहे, चायनीज सेंटर | ५०००/- | २५००/- | ५० ते १०० चौ. मिटरपर्यंत | १०००/- | ५००/- |
| ५०० चौ. फुटपर्यंत हॉटेल | ३०००/- | १५००/- | १०० ते १५० चौ. मिटरपर्यंत | १५००/- | ७५०/- |
| ५०१ चौ. फुट पुढील क्षेत्राकरीता हॉटेल | ५०००/- | २५००/- | १५० चौ. मिटरपुढे प्रत्येक ५० चौ.मि. क्षेत्रफळास ५५० अधिक फी आकारावी जास्तीत जास्त फी. | १००००/- | |

वरील प्रमाणे सुधारीत परवाना शुल्क आकारणेस ही स्थायी समिती सभा मंजुरी देत असुन मा. महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणेस मान्यता देत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा अनुमोदक :- श्री. लक्ष्मण जंगम**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२४, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकरीता ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) वाहन खरेदी निविदेबाबत.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. मा. आयुक्त साहेब, आपण मध्यंतरी मा. महासभेमध्ये ठराव केला की, आपल्याकडे सक्षम अधिकारी नसल्या कारणाने महाराष्ट्र शासनाकडून अधिकारी मागणी केलेली आहे जर आपण वाहन खरेदी करत असू तर असे सक्षम ड्रायव्हर वगैरे आहे का? नाहीतर एवढी मोठी गाडी घेणार नाहीतर अस होईल की आली गेली लगेच गॅरेजमध्ये जाईल. गॅरेजचा खर्च पण आपल्या अवाक्याबाहेर आहे. घेणं गरजेचं आहे मी त्याच्याशी सहमत आहे. परंतु, अधिकारी सक्षम नसल्याकारणाने त्याचा ड्रायव्हर सक्षम मिळेल तर त्याचा आपल्याला प्रशिक्षण द्यायला लागेल. याचा पण विचार करा. प्रशासनासाठी कुठे पाठवायचं? कारण ड्रायव्हर हे ३ शिफ्ट मध्ये असतात तर ३ ड्रायव्हर तयार करायला लागतील मग, त्याच्यामध्ये पण जर १ सुट्टीवर असला तर ४ या ॲडीशनल तयार ठेवावा लागेल. मग, याच्यासाठी ही प्रस्तावात आणायचं. कारण, आपल्याकडे सक्षम अधिकारी नाही. ज्यांना आपण मान्यता द्यायची होती. शासनाने याच पद मजूर केलेलं त्यांना दिलं नाही. मग, अशा माणसांना आपल्याकडे ड्रायव्हर नसतील मग यांना प्रशिक्षण कधी देणार? आणि गाडी किती टाईमात येईल. याचं निवेदन केलं तर बर होईल.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, हेवी व्हेईकल चालवणारा ड्रायव्हर ती गाडी चालवू शकतो. त्यामुळे त्यात काय बदल आहे यात काय बदल आहे. फक्त मोठी गाडी आहे एवढचं आता जे अग्निशमनचे ड्रायव्हर गाडी चालवतात. तेच ड्रायव्हर हिच गाडी चालवू शकतील. त्यात काय विशेष नाही. फक्त आतमधले रस्ते, गल्ली बोळामध्ये जाणार नाही. मेन रोडवरच उभी राहिल. त्यासाठी ज्यादा मजले जे आहेत त्यासाठी ही गाडी खरेदी करावी लागली आहे. कारण, ४ F.S.I. Rental Housing Scheme Government ने दिलेली आहे. नंतर काही लोक मोकळी जागा जास्त ठेवून उंच जाण्याचा प्रयत्न करतात. तर तिथे आग लागली तर अडचण होवू नये म्हणून खरेदीचा प्रस्ताव आणला आहे.

**शशिकांत भोईर :-**

आपल्याला आवश्यक आहे. परंतु, आपल्याला जे ड्रायव्हर लागतील आणि आपण बोलले......

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ड्रायव्हर ऑपरेटरचे पोस्ट आपण भरलेले आहे त्यांच्या पोस्ट शासनाने सॅन्शन केलेले आहे. त्यानूसार आपण पद भरलेली आहे. २ वर्ष ट्रेनिंगमध्ये आपले सर्व ऑपरेटर ................

**शशिकांत भोईर :-**

ज्यावेळेला सन्मा. सदस्य मिलन पाटील यांच्याकडे आग लागलेली त्यावेळी अग्निशमन दलाचे जवान गेले. त्यावेळेस त्यांच्याकडून आग विझली गेली नाही. कारण, पंपच सुरु झाला नाही. अन्य कोणीतरी चालू करुन दिला.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, त्यांना प्रशिक्षण देणार ना.

**शशिकांत भोईर :-**

प्रशिक्षित असला तरच होणार. आता तुम्हाला अनुभव असल्याशिवाय आयुक्तांच्या जागेवर आहात का? ज्याला वाहन चालकाची माहिती असेल तसा तो वाहन चालवेल ना. त्याचा तो पंप ऑपरेट करता नाही आला. त्यामुळे जास्त आग लागली. म्हणून एवढं मोठ वाहन घेता ना. अशाच चार लोकांना प्रशिक्षण दिलं तर ते वाहन पण खराब करणार नाही. ज्यादा बिगाडा झाल्याचे पण निर्दशनास येणार नाही. एकदा ऑपरेट करायला गेल तर हे तोडलं दुसरा गेला तर दुसरं तोडलं असे अनेक प्रकारे होऊ शकतात.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब २ वर्ष तो ट्रेनिंग देणार आहे. स्वतःचा माणूस येईल ती गाडी कशी हँडल करायची ते शिकवेल. ते सगळ ठेकेदारच करणार आहे.

**शशिकांत भोईर :-**

तेच निवेदन पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

वर्तमान अंदर आपके पास जो फायर ब्रिगेड की गाडी है। वह कितने माले तक जा सकती है?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१४ माले तक

**भगवती शर्मा :-**

यह गाडी छोडके अभी वर्तमान मे जो व्यवस्था है वह गाडी कितने माले तक जा सकती है?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२-३ माले के उपर नही जा सकती

**भगवती शर्मा :-**

मतलब अपने पास अबतक कोई व्यवस्था नही है। यही विषय मा. महासभा के अंदर मे आया था की कोई व्यक्ती अपने पास से महानगरपालिका को डोनेट कर रहा था। यह बात सही है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सही है।

**भगवती शर्मा :-**

तो फिर यह unnecesary महापालिका के ..........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, पुढे लागणार.

**मा. सभापती :-**

लगेगा इनके कहने का मतलब है क्यों नही लिया?

**भगवती शर्मा :-**

लगने का मतलब एक साल के अंदर दो-दो गाडी ले लुंगा।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब, गाडी लागणारच ज्याप्रमाणे कॅपेसिटी आहे त्याप्रमाणे आपण परवानगी देत आहोत.

**लक्ष्मण जंगम :-**

मा. सभापती साहेब, आपण काय म्हणतो की, जी गाडी आपण खरेदी करायला चाललो. तशाच कंडीशनची गाडी किंवा त्याच रेट ची गाडी आपल्याला मोफत मिळत होती. पहिली गोष्ट अशी की, ती गाडी मिळत होती का? हे पहिलं नक्की बघा. जर मिळत होती तर कोणाच्या माध्यमातून मिळत होती हा दुसरा विषय आहे आणि जर आपल्याला मोफत मिळत होती तर का घेतली नाही? ह्या तीन गोष्टींचा खुलासा झाला पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

मा. सभापती साहेब, ही गाडी खरेदी करण्याचा प्रस्ताव त्यांनी पत्र देण्याच्या अगोदर पासून चालु होता आणि गाडीची कॅपेसिटी १४ माळ्यापर्यंत जाण्याची आहे आणि तो जो विकासक देत होता तो २१ माळ्यापर्यंत जाण्याच्या कॅपेसिटी पर्यंत देत होता. त्यावेळेला मा. महासभेत आम्ही रीक्वेस्ट केली तो विषय घ्या तर तेव्हा तो विषय घेतला गेला नाही. माझ्या माहितीप्रमाणे अजून मी कंर्म्फर्म केलेलं नाही. तुम्ही ठराव करुन दिला नाही. त्यामुळे मला गाडी द्यायची नाही असे पत्र दिले आहे. आम्हाला समजलं आहे. कारण परत मी गेलो होतो की, विषय लवकर घ्या आणि हे का तर विषय न घेतल्यामुळे तो सबजेक्ट पाठीमागे राहिला आणि दिला तरी ती गाडी लागणार आहे ही गाडी सुध्दा लागणार आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

आता शशिकांत भोईर साहेब जे विचारत होते त्याचा खुलासा पान ४ वर आहे. तसेच सदर वाहनाच्या ॲनूअल मेंनटेनन्स ऑपरेटींग हे ३ वर्षाकरीता पुढील प्रमाणे दर सादर केलेले आहे. तर तुम्ही जे विचारत होते त्याचं हे उत्तर आहे का?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

वर्षाला मेंनटेनन्स लागते ना.

**लक्ष्मण जंगम :-**

ऑपरेट म्हणजे चालवणे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

Spear Part cities spear part Dubligation त्यासाठी आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

तुम्ही Operating बोलले तर Operating म्हणजे? maintainance म्हणजे ठिक आहे. maintainance तर झालं.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्या कॉस्टमध्ये तो इथे २ वर्ष राहणार आहे १ ऑपरेट २ वर्षासाठी इथे राहणार आहे ते ट्रेन्ड करणार आहे.

**लक्ष्मण जंगम :-**

मग ह्यांना तुम्ही तेच नेमकं सांगायला पाहिजे की, त्याचे आम्ही दाखवला आहे. पहिले वर्ष, दुसरे वर्ष, तिसरे, चौथे पाचवे वर्ष जो खर्च दाखवलेला आहे ते पाच वर्ष आपल्याला थोडक्यात ट्रनिंग देणारा दाखवलेला आहे.

**मा. आयुक्त :-**

ट्रेनिंग देणार आहे आणि विकासकाकडून अग्निशमन ना हरकत दाखला कॅपिटेशन फी घेतो ते त्याच प्रपोजसाठी खर्च केला पाहिजे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ती जनरल फंडामध्ये युज होऊ शकत नाही.

**स्नेहा पांडे :-**

मा. सभापती साहब, मा. महासभा मे इसके लिए कितने की मंजुरी दी थी वह मुझे जरा जानना है?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यावेळेस ५ कोटीची मंजुरी दिलेली होती.

**स्नेहा पांडे :-**

उसमे से आपने खर्च भी किया है। अभि अपने पास शिल्लक........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्यावेळेस २००८ ला ठराव झाला होता. मध्यंतरी पद मंजुरी नव्हते. त्याद्वारे पद भरली नव्हती म्हणून आपण गाडी घेतली नव्हती. आता पद मंजुर झाली म्हणून आपण आता घेतो.

**स्नेहा पांडे :-**

अपना तो ५ कोटी रु. काही मंजुरी है ना?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आर्थिक मंजुरी झाली तर घेवू शकतो ना.

**स्नेहा पांडे :-**

५ कोटी की मंजुरी है। अभि उसमे से थोडा खर्च भी किया है। ३ लाख ६० हजार रु........

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

म्हणून उरलेल्या रक्कमेसाठी पुढच्या बजेटमध्ये तरतुद करणार.

**स्नेहा पांडे :-**

ऐसा कर सकते है क्या?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कर सकते है ना। आगे के बजट मे तरतुद कर सकते है।

**स्नेहा पांडे :-**

एक्झाम्पल के लिए १ करोड के रस्ते हमलोग लाये बजेट नही है तो अगले साल, उसके अगले साल तरतुद नही कर सकते ना। जितना अपने पास बजेट रहता है उसमे से ही करना चाहिए ना।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

उसकी कॉस्ट बढ गई तो फिर कर सकते है।

**स्नेहा पांडे :-**

उसकी जो पेमेंट है यह युरो मे देना है। तो युरो का रेट बढता घटता रहता है। वह हिसाब से कैसे करेंगे। अगर कल युरो का रेट बढ जाता है तो भी फरक पढता है।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कम भी हो सकता है। ज्यादा भी हो सकता है। इसलिए अंदाज मे लिखा है।

**स्नेहा पांडे :-**

आप एक ॲक्जेट किजीए ना।

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

ॲक्जेट नही हो सकता। उस टाईम जो अपुन पेमेन्ट देंगे तो उस टाईम का ही रेट देंगे। इसलिए अंदाजित लिखा है।

**स्नेहा पांडे :-**

तो अभी हमलोग कितने की मंजुरी दे रहे है?

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

जिसने टेंडर भरा था उस टाईम का वह रेट है।

**स्नेहा पांडे :-**

टेंडर भरा था उस टाईम का है। अभी युरो का रेट बढ गया होगा तो आप मंजुरी ५.१६ की ले रहे है।

**संभाजी पानपट्टे ( मा. उपायुक्त ) :-**

ऐसा नही है। अंदाजित मंजुरी ले रहे है।

**मा. सभापती :-**

पुढचा विषय घ्या.

**शशिकांत भोईर :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल हि अत्यावश्यक सेवा असून चोवीस तास कार्यरत असते. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दल सुसज्ज राहणे गरजेचे आहे.

मा. महासभा दि. १०/१०/२००८ प्रकरण क्र. ५६ ठराव क्र. ४७ अन्वये अग्निशमन दलातील ४५ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदीकामी मंजुरी दिली होती. त्यानुसार गठित करण्यात आलेल्या निवड समितीने एकमताने मिरा भाईंदर शहराची भौगोलिक परिस्थितीनुसार ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) खरेदी करणेकरिता मंजुरी दिली होती. त्यानुसार दि. ०५/०९/२०१० रोजी जाहीर निविदा सुचना व ई-टेंडरिंगद्धारे निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निनिदा सुचनेनुसार

१) मे. मेट्झ,

२) मे. इग्नेस ब्रान्टेक्नीक

३) मे. रोझन बॉर यांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

उपरोक्त निविदाधारकांनी त्यांचे निविदेसोबत सादर केलेले तांत्रिक तपशिल संदर्भिय पत्र क्र ०३ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी, ठाणे यांचे कडून तपासून प्राप्त झाले आहेत. संदर्भ क्र. ०४ अन्वये सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार दि. २४/१२/२०१० रोजी सदर एरिलय लॅडर खरेदी कामी गठीत करण्यात आलेल्या निवड समिती सदस्य मा. शहर अभियंता सो., मा. मुख्यलेखापरिक्षक सो., मा. कार्यकारी अभियंता सो., मा. मुख्य लेखाधिकारी सो., मा. उपायुक्त सो. (अग्नि), यांचे सह झालेल्या बैठकीत एकमताने उपरोक्त निविदाधारकांची दरपत्रके उघडण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्यानुसार उपरोक्त निविदाधारकांची दरपत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत. सदर निविदाधारकांनी सादर केलेल्या दरानुसार तुलनात्मक तक्ता पुढिल प्रमाणे

उपरोक्त निविदाधरकांनी सादर केलेले दर हे युरो डॉलर मध्ये नमुद केले आहेत. सदर दराचे मे. मेट्झ व मे. रोझन बॉर यांनी भारतीय चलनातील दरा करिता प्रती युरो रु. ६०/- तर मे. हिग्नेस ब्रान्टेक्नीक प्रती युरो रु. ६२/- याप्रमाणे दर नमुद केले आहेत. त्यानुसार उपरोक्त निविदाधरकांचे भारतीय चलनाप्रमाणे कराव्यतिरिक्त दर (FOB Price) पुढिल प्रमाणे आहे.

| SR. | Company Name | DESCRIPTION | QUANTITY | COST OF EQUIPMENT F.O.B CURRENCY (Euro) | Exchange Rate | Amount In Rupees | Total F.O.B. Price In Rupees ( A + B) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s METZ | **A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | **8,78,273/-** | **1 Euro = Rs.60/-** | 5,26,96,380/- | 5,26,96,380/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | ------ | |
| 2 | M/s EGENES | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | **9,01,089/-** | **1 Euro = Rs.62/-** | 5,58,67,518/- | 5,60,22,518/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | **2,500/-** | | 1,55,000/- | |
| 3 | M/s ROSENBAUR | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | **8,61,053.80/-** | **1 Euro = Rs.60/-** | 5,16,63,228/- | 5,16,63,228/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | ---- | |

उपरोक्त नमुद निवीदाधारकांनी सदर वाहनाच्या कराबाबत सादर केलेल्या कराचा तपशिल पुढील प्रमाणे.

**तक्ता क्र. २ :-**

| SR. | Company Name | DESCRIPTION | QUANTITY | SHIPMENT TO MUMBAI/INDIA OF COLMUN (1) ITEM CURRENCY (Euro) (A) | CLEARANCE HANDLING INDIAN AGENTS COMMISSION, INDIAN TRANSPORT & INSURANCE (Euro) (B) | Total (C=A + B) | Exchange Rate (D) | Total Tax Price In Rupees ( E=C X D) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s METZ | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL) LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | 9,200/- | 8,965/- | 18,165/- | 1 Euro = Rs.60/- | 10,89,900/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | | | |
| 2 | M/s EGENES | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | 9,400/- | 9,627/- + taxes & duties at actual | 19,027/- | 1 Euro = Rs.62/- | 11,79,674/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | ( Include in price) | INCLUDED ABOVE | | | |
| 3 | M/s ROSENBAUR | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | 9,000/- | 8,160/- | 17,160/- | 1 Euro = Rs.60/- | 10,29,600/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | | | |

उपरोक्त नमुद तक्ता क्र. १ मध्ये नमुद दरात भारतामध्ये आकारण्यात येणारे कर व इतर अन्य करांचा समावेश नाही. निविदाधारकांनी सादर केलेले दर हे केवळ वाहन भारतामध्ये आयात करे पर्यंत (जे.एन.पी.टी/मुंबई डॉक) मर्यादीत आहेत, त्यामुळे शासनामार्फत आकारण्यात येणारे कर उदा. आयात कर, उत्पादन शुल्क कर, आर.टी.ओ., वाहतूक कर तसेच इतर आवश्यक कर महापालिकेने प्रदान करावयाचे आहेत. तसेच मंजूर दरा एवढी रक्कम लेटर ऑफ क्रेकिट द्वारे स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये भरणा करावे लागणार आहे. वरिल सर्व बाबींचा उल्लेख निविदेच्या अटिशर्तीमध्ये करण्यात आलेला आहे. सदर अटिशर्तीनुसार

१) मंजूर दरा एवढे लेटर ऑफ क्रेकिट उघडल्यावर त्यातील ५०% रक्कम अग्रीम देण्यात येणार असुन सदर अग्रीम रक्कम देतेसमयी त्या ५०% रक्कम एवढया रक्कमेची बँक गॅरेंटी स्विकारण्यात येईल.
२) लेटर ऑफ क्रेकिट मधिल ३५% रक्कम वाहन शिपमेंट समयी दयावी लागणार आहे व
३) उर्वरित १५% रक्कम वाहन अग्निशमन दलाच्या ताब्यात मिळाल्यावर अदा करावी लागणार आहे.
४) १५% रक्कम अदा झाल्यावर मंजूर दराच्या १०% एवढी रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन बँक गॅरेंटी स्वरुपात दोन वर्षाकरिता ठेकेदाराकडुन घेण्यात येईल
५) तसेच सदर वाहनाच्या ॲनुअल मेंटनेन्स ऑपरेटींग कॉन्ट्रॅक्ट करिता प्रति वर्षाकरिता पुढिल प्रमाणे दर सादर केले आहेत

| | |
|---|---|
| १) वर्ष पहिले | - रु. ८,१४,४५०/- |
| २) वर्ष दुसरे | - रु. ५,९०,०७०/- |
| ३) वर्ष तीसरे | - रु. ८,०८,४७०/- |
| ४) वर्ष चौथे | - रु. ७,७७,४१९/- |
| ५) वर्ष पाचवे | - रु. ८,९१,२०४/- |

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक ब सार्वजनिक सुरक्षितता अग्निशमन विभाग या लेखाशिर्षा अंतर्गत नवीन फायर फायटर खरेदी करिता रु. ५.०० कोटी ऐवढी तरतूद करण्यात आली आहे. चालू वर्षात दोन मिनी टेंडर बॉडी बांधणीकामीचे देयक रु. ४९,९३,४३६/- बोलेरो जीपचे देयक रु. ६,४२,०७०.४७/- व अम्बुलन्सचे देयक रु. ७,८२,९२६.२५/- असे एकुण देयक रु. ६४,१८,४३२.७२/- अदा करणेत आले असुन दोन मोठे वॉटर टेंडर बॉडी बांधणीकामीचे देयक रु. ७०,३५,४७०/- करावे लागणार असून वरील तरतूदीतून सदर रक्कम वजा जाता रुपये ३,६५,४६,०९७.२८/- एवढी तरतूद शिल्लक राहणार आहे. त्यामध्ये उर्वरित रक्कम रु. १,५१,१७,१३१/-एवढी जमा करून एकूण रक्कम रुपये ५,१६,६३,२२८/- (वाहनाची मुळ किंमत) अधिक रु. १०,२९,६००/- शिपमेंट चार्जेस, क्लिअरिंग, हँडलिंग, इंडियन एजंट कमिशन, ट्रान्सपोटेशन, इंश्युरंस व अंदाजे रक्कम रु. १,६०,००,०००/- आयात कर, उत्पादन शुल्क कर, आर.टी.ओ., वाहतूक कर तसेच इतर आवश्यक करापोटी लेटर ऑफ क्रेकिट उघडून सदरची रक्कम (अंदाजे रु. ६,७८,०९,९५९/-) त्या खात्यामध्ये जमा करावी लागणार आहे.

तरी अग्निशमन दलाकरिता उपरोक्त वाहन ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) खरेदी करीता उपरोक्त दरांपैकी सर्वात कमी दराच्या मे. रोझन बॉर यांच्या निविदेस व लेटर ऑफ क्रेकिट चे स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये रक्कम रु. ६,७८,०९,९५९/- ही जमा करणेस तसेच उर्वरित रक्कमेची तरतूद येत्या आर्थिक वर्षात करणेस हि मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**भगवती शर्मा :-**

इस ठराव को मेरा अनुमोदन है।

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वांनुमते मंजुर करण्यात येत आहे. पुढील विषय घेण्यात यावा.

**प्रकरण क्र १२४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाकरीता ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी.टी.एल.) वाहन खरेदी निविदेबाबत.

**ठराव क्र ११४ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे अग्निशमन दल हि अत्यावश्यक सेवा असून चोवीस तास कार्यरत असते. आपत्कालीन परिस्थितीत अग्निशमन दल सुसज्ज राहणे गरजेचे आहे.

मा. महासभा दि. १०/१०/२००८ प्रकरण क्र. ५६ ठराव क्र. ४७ अन्वये अग्निशमन दलातील ४५ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म खरेदीकामी मंजुरी दिली होती. त्यानुसार गठित करण्यात आलेल्या निवड समितीने एकमताने मिरा भाईंदर शहराची भौगोलिक परिस्थितीनुसार ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) खरेदी करणेकरिता मंजुरी दिली होती. त्यानुसार दि. ०५/०९/२०१० रोजी जाहीर निविदा सुचना व ई-टेंडरिंगद्वारे निविदा प्रसिध्द करण्यात आली. सदर निनिदा सुचनेनुसार

१) मे. मेट्झ,

२) मे. इग्नेस ब्रान्टेक्नीक

३) मे. रोझन बॉर यांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

उपरोक्त निविदाधारकांनी त्यांचे निविदेसोबत सादर केलेले तांत्रिक तपशिल संदर्भिय पत्र क्र ०३ अन्वये मुख्य अग्निशमन अधिकारी, ठाणे यांचे कडून तपासून प्राप्त झाले आहेत. संदर्भ क्र. ०४ अन्वये सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार दि. २४/१२/२०१० रोजी सदर एरिलय लॅडर खरेदी कामी गठीत करण्यात आलेल्या निवड समिती सदस्य मा. शहर अभियंता सो., मा. मुख्यलेखापरिक्षक सो., मा. कार्यकारी अभियंता सो., मा. मुख्य लेखाधिकारी सो., मा. उपायुक्त सो. (अग्नि), यांचे सह झालेल्या बैठकीत एकमताने उपरोक्त निविदाधारकांची दरपत्रके उघडण्याबाबत निर्णय घेण्यात आला त्यानुसार उपरोक्त निविदाधारकांची दरपत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत. सदर निविदाधारकांनी सादर केलेल्या दरानुसार तुलनात्मक तक्ता पुढिल प्रमाणे

उपरोक्त निविदाधरकांनी सादर केलेले दर हे युरो डॉलर मध्ये नमुद केले आहेत. सदर दराचे मे. मेट्झ व मे. रोझन बॉर यांनी भारतीय चलनातील दरा करिता प्रती युरो रु. ६०/- तर मे. हिग्नेस ब्रान्टेक्नीक प्रती युरो रु. ६२/- याप्रमाणे दर नमुद केले आहेत. त्यानुसार उपरोक्त निविदाधरकांचे भारतीय चलनाप्रमाणे कराव्यतिरिक्त दर (FOB Price) पुढिल प्रमाणे आहे.

| SR. | Company Name | DESCRIPTION | QUANTITY | **COST OF EQUIPMENT F.O.B CURRENCY (Euro)** | **Exchange Rate** | **Amount In Rupees** | **Total F.O.B. Price In Rupees ( A + B)** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s METZ | **A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | **8,78,273/-** | **1 Euro = Rs.60/-** | 5,26,96,380/- | 5,26,96,380/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | ------ | |
| 2 | M/s EGENES | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | **9,01,089/-** | **1 Euro = Rs.62/-** | 5,58,67,518/- | 5,60,22,518/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | **2,500/-** | | 1,55,000/- | |
| 3 | M/s ROSENBAUR | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | **8,61,053.80/-** | **1 Euro = Rs.60/-** | 5,16,63,228/- | 5,16,63,228/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | ---- | |

उपरोक्त नमुद निवीदाधारकांनी सदर वाहनाच्या कराबाबत सादर केलेल्या कराचा तपशिल पुढील प्रमाणे.

**तक्ता क्र. २ :-**

| SR. | Company Name | DESCRIPTION | QUANTITY | **SHIPMENT TO MUMBAI/INDIA OF COLMUN (1) ITEM CURRENCY (Euro) (A)** | **CLEARANCE HANDLING INDIAN AGENTS COMMISSION, INDIAN TRANSPORT & INSURANCE (Euro) (B)** | **Total (C=A + B)** | **Exchange Rate (D)** | **Total Tax Price In Rupees ( E=C X D)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | M/s METZ | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL) LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | 9,200/- | 8,965/- | 18,165/- | 1 Euro = Rs.60/- | 10,89,900/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | | | |
| 2 | M/s EGENES | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | 9,400/- | 9,627/- + taxes & duties at actual | 19,027/- | 1 Euro = Rs.62/- | 11,79,674/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | ( Include in price) | INCLUDED ABOVE | | | |
| 3 | M/s ROSENBAUR | **(A)** SUPPLY MOUNTING AND DELIVERY OF AERIAL LADDER PLATFORM (TTL)LADDER PLATFORM - 39 Mtrs | 1 NO | 9,000/- | 8,160/- | 17,160/- | 1 Euro = Rs.60/- | 10,29,600/- |
| | | **(B)** SPARE PARTS LISTED IN SCHEDULE 5 (QTY AS PER MANUFACTURERS RECOMMENDATIONS) | 1 SET | | | | | |

उपरोक्त नमुद तक्ता क्र. १ मध्ये नमुद दरात भारतामध्ये आकारण्यात येणारे कर व इतर अन्य करांचा समावेश नाही. निविदाधारकांनी सादर केलेले दर हे केवळ वाहन भारतामध्ये आयात करे पर्यंत (जे.एन.पी.टी/मुंबई डॉक) मर्यादीत आहेत, त्यामुळे शासनामार्फत आकारण्यात येणारे कर उदा. आयात कर, उत्पादन शुल्क कर, आर.टी.ओ., वाहतूक कर तसेच इतर आवश्यक कर महापालिकेने प्रदान करावयाचे आहेत. तसेच मंजूर दरा एवढी रक्कम लेटर ऑफ क्रेकिट द्वारे स्वतंत्र बँक खाते उघडून त्यामध्ये भरणा करावे लागणार आहे. वरिल सर्व बाबींचा उल्लेख निविदेच्या अटिशर्तींमध्ये करण्यात आलेला आहे. सदर अटिशर्तीनुसार

१) मंजूर दरा एवढे लेटर ऑफ क्रेकिट उघडल्यावर त्यातील ५०% रक्कम अग्रीम देण्यात येणार असुन सदर अग्रीम रक्कम देतेसमयी त्या ५०% रक्कम एवढया रक्कमेची बॅक गॅरेंटी स्विकारण्यात येईल.

२) लेटर ऑफ क्रेकिट मधिल ३५% रक्कम वाहन शिपमेंट समयी दयावी लागणार आहे व

३) उर्वरित १५% रक्कम वाहन अग्निशमन दलाच्या ताब्यात मिळाल्यावर अदा करावी लागणार आहे.

४) १५% रक्कम अदा झाल्यावर मंजूर दराच्या १०% एवढी रक्कम सुरक्षा अनामत म्हणुन बॅक गॅरेंटी स्वरुपात दोन वर्षाकरिता ठेकेदाराकडुन घेण्यात येईल

५) तसेच सदर वाहनाच्या ॲनुअल मेंटनेंन्स ऑपरेटींग कॉन्ट्रॅक्ट करिता प्रति वर्षाकरिता पुढिल प्रमाणे दर सादर केले आहेत

| | |
|---|---|
| १) वर्ष पहिले | - रु. ८,१४,४५०/- |
| २) वर्ष दुसरे | - रु. ५,९०,०७०/- |
| ३) वर्ष तीसरे | - रु. ८,०८,४७०/- |
| ४) वर्ष चौथे | - रु. ७,७७,४१९/- |
| ५) वर्ष पाचवे | - रु. ८,९१,२०४/- |

सन २०१०-११ या आर्थिक वर्षात लेखाशिर्षक ब सार्वजनिक सुरक्षितता अग्निशमन विभाग या लेखाशिर्षा अंतर्गत नवीन फायर फायटर खरेदी करिता रु. ५.०० कोटी ऐवढी तरतूद करण्यात आली आहे. चालू वर्षात दोन मिनी टेंडर बॉडी बांधणीकामीचे देयक रु. ४९,९३,४३६/- बोलेरो जीपचे देयक रु. ६,४२,०७०.४७/- व अम्बुलन्सचे देयक रु. ७,८२,९२६.२५/- असे एकूण देयक रु. ६४,१८,४३२.७२/- अदा करणेत आले असुन दोन मोठे वॉटर टेंडर बॉडी बांधणीकामीचे देयक रु. ७०,३५,४७०/- करावे लागणार असून वरील तरतूदीतून सदर रक्कम वजा जाता रुपये ३,६५,४६,०९७.२८/- एवढी तरतूद शिल्लक राहणार आहे. त्यामध्ये उर्वरित रक्कम रु. १,५१,१७,१३१/-एवढी जमा करुन एकूण रक्कम रुपये ५,१६,६३,२२८/- (वाहनाची मुळ किंमत) अधिक रु. १०,२९,६००/- शिपमेंट चार्जेस, क्लिअरिंग, हँडलिंग, इंडियन एजंट कमिशन, ट्रान्सपोटेशन, इंश्युरंस व अंदाजे रक्कम रु. १,६०,००,०००/- आयात कर, उत्पादन शुल्क कर, आर.टी.ओ., वाहतूक कर तसेच इतर आवश्यक करापोटी लेटर ऑफ क्रेकिट उघडून सदरची रक्कम (अंदाजे रु. ६,७८,०९,९५९/-) त्या खात्यामध्ये जमा करावी लागणार आहे.

तरी अग्निशमन दलाकरिता उपरोक्त वाहन ३९ मीटर उंच एरियल लॅडर प्लॅटफॉर्म (टी. टी. एल) खरेदी करीता उपरोक्त दरांपैकी सर्वात कमी दराच्या मे. रोझ्न बॉर यांच्या निविदेस व लेटर ऑफ क्रेकिट चे स्वतंत्र खाते उघडून त्यामध्ये रक्कम रु. ६,७८,०९,९५९/- ही जमा करणेस तसेच उर्वरित रक्कमेची तरतूद येत्या आर्थिक वर्षात करणेस हि मा. स्थायी समिती सभा मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. शशिकांत भोईर अनुमोदक :- श्री. भगवती शर्मा**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्रं. १२५, महानगरपालिकेच्या पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांना नव्याने भ्रमणध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती महोदय, इसके अंदर गोषवारा दिया है। तो सब कंपनीया रेट की कंपेरिजन के अंदर, प्रशासन ने यह नक्की किया है की, एअरटेल की दर सबसे कम है। लेकिन इस शहर मे नेटवर्क का अनुभव है एअरटेल के बारेमे। एअरटेल का नेटवर्क सब जगह मिलता भी नही। उसका सर्व्हीस भी अच्छा नही है। भले ही सस्ता देखने जा रहे है लेकिन उसको सर्व्हिस मिलेगी नही। फिर हम नगरसेवक इन पदाधिकारीयोकी शिकायत करेंगे। मेरा ऐसा सोच है की वर्तमान के अंदर मे इस शहरके अंदर ओडाफोन की जो सुविधा है, नेटवर्क है वह सबसे अच्छी है। तो इसके अंदर विचार करके वोडाफोन की सर्व्हिस ली जायेगी तो सबके लिए बेहतर है। और

सिधा उसके लिए कंपनीको डायरेक्ट बुलाके बारजिंग करके कमसे कम रेट के अंदर का प्रस्ताव दे सकते है। कोई भी मध्य बीच के अंदर न रखते हुए। सिधा बुलाके ओडाफोन के माध्यम से सर्व्हिस ले सकते है।

**चंद्रकांत म्हात्रे :-**

हमलोग जिस अधिकारी को फोन करते है। वह फोन उठाते ही नही।

**मा. आयुक्त :-**

मागच्या वेळेला सांगितल होत की, ज्यांनी फोन उचलल नाही. त्याचा टाईमिंग नोंद करा. मग, त्या अधिकाऱ्यावर कारवाई करू. नाव सांगा टाईमिंग सांगा आता सस्पेन्टची ऑर्डर काढतो.

**शशिकांत भोईर :-**

एअरटेलच कार्ड दिल ना. तर एअरटेलच नेटवर्क कुठे-कुठे लागत नाही. मग, तो मोका अधिकाऱ्यांना मिळेल. म्हणुन त्यांना ओडाफोनच कार्ड दिल तर बरं होईल कारण, वोडाफोनच नेटवर्क सर्व ठिकाणी आहे.

**रामनारायण दुबे :-**

मा. सभापती साहब, एअरटेल, वोडाफोन और आयडिया. यह तीनो का कोटेशन मंगाके और जो रस्ता पडेगा, मतलब तीनो मेसे जिसका इस्टीमेट कम हो और जिसका नेटवर्क अच्छा है .........

**मा. सभापती :-**

अभी अपने पास रिलायन्स का फोन है। डोंगरी जाओ, या उत्तन आजो, या पाली साईट मे जाओ आपका एक भी फोन नही लगता है। ऐसे एअरटेल का भी है। इसके लिए थोडा पैसा ज्यादा जायेगा कुछ प्रॉब्लेम नही लेकिन ओडाफोन का नेटवर्क बहोत अच्छा है। क्योकी कहीपर भी जाओ, वहॉपर फोन लग जायेगा।

**भगवती शर्मा :-**

आपका कहना सही है। रेट के लिए। लेकिन थोडे से सस्ते के लिए फिर वही प्रॉब्लेम आयेगी।

**शशिकांत भोईर :-**

अपनी पालिका का जो १००० रू. का लिमिट है वही रहेगा ना। उसमे तो हम बदली ही नही कर रहे है।

**मा. सभापती :-**

बदली क्यो करना है। जो है वही है। ओडाफोन की सर्व्हिस अच्छी है, उनके पास जाओ।

**शशिकांत भोईर :-**

त्याकरिता प्रशासनाने त्याच निवेदन कराव. की, कस करण्यात याव. त्यांचा रेट तोच राहिल. फक्त एअरटेल न घेता वोडाफोन घ्यायच. कारण त्याची सर्व्हिस सर्व ठिकाणी असते.

**मा. आयुक्त :-**

तुम्ही किती वाजता फोन केला आणि कोणी फोन उचलला नाही ते पुढच्या वेळेला आणुन दाखवा ना.

**लक्ष्मण जंगम :-**

सगळ्यामध्ये, पुर्ण महानगरपालिकेमध्ये व्यस्त कमिशनर साहेब, पण त्यांना कधीही फोन लावला आणि मिसकॉल मध्ये गेला तरीही ते लगेच कॉल करतात ही वस्तुस्थिती आहे. बाकीच्या लोकांनी आपण एकमेकांनी सगळ्यांनीच अशा पध्दतीचं सौजन्य दाखवलं तर चांगलं राहील.

**भगवती शर्मा :-**

यांना सांगा आणि अधिकार डी-सेंन्ट्रलाईज करताना बोज कमी होईल.

**सुधीर राऊत (मा. उपायुक्त सो. (मु.)) :-**

याच्यासाठी आपण आयडीया, टाटा डोकोमो, एअरटेल आणि व्होडाफोन या सर्वांचे दर मागविले होते. सर्वात कमी दर हे एअरटेलचे आलेले आहेत. तद्नंतर सर्वात महत्वाचा प्रश्न असा की, कारण रीलायन्सचं जास्तीत जास्त बील आपल्याला ऑन ॲन ॲवरेज ९०,००० च्या वर भ्रमणध्वनीच अधिकाऱ्यांकरीता आणि पदाधिकाऱ्यांकरीता जे आहे ते जवळ-जवळ मासिक दर ८ ते १०,००० मिनिमम बिल येतं. त्याव्यतिरीक्त सर्वात महत्वाचा प्रश्न असा होता की, रिलायन्स ची जी सेवा होती ती सीडीएमए होती आणि आपण आता स्विच ओव्हर करतो जीएसएम सेवेकडे तर जीएसएम सेवेकरीता आपण एकदा पर्यायी मान्य केला तर तद्नंतर सीडीएमए चे जे मोबाईल चे संच आहे ते निरुपयोगी होतील. ते परत घेण्याची तयारी कुठला कंपनीची आहे आणि त्याच्या अगेंन्स्ट ते कॉस्ट देणार आहेत का? त्याबद्दल आम्ही सर्व कंपन्यांकडे चौकशी केली तर फक्त एअरटेल ने ते संच परत घेण्याची तयारी दर्शविली अथवा बाकी कुठलीही कंपनी हे संच परत घ्यायला तयार नाही आणि हा जो ७२ संच ऑल टुगेदर कॉर्पोरेशनचे आहे त्या ७२ संचांच्या किंमतीच रिॲम्ब्रेसमेंट कोणी तयार करायला नसल्यामुळे आणि एअरटेल ने त्याच्यामध्ये असा १ क्लॉज टाकलेला आहे की यापूर्वी त्यांचे यापूढेही त्यांचे जे काही किफायतशीर प्लान राहतील ते त्याचा लाभ आपल्याला देत राहतील. रिलायन्स कडे असे अनेक प्लान सुरुवातीपासून होते. रिलायन्स टु रिलायन्स फ्री, रिलायन्स टु त्यांची लॅन्ड लाईन फ्री अशा पध्दती होत्या. पण त्यांनी आपल्याला कुठल्याही प्लानचा सुरुवातीपासून फायदा दिला नाही. त्यामुळे आपली मोबाईलची जी बिलं आहेत ती अत्यंत वाढत गेली आणि जास्त येत होती. याद्वारा मोबाईलच्या खर्चात बचत होण्याची शक्यता आहे आणि सर्वात महत्वाचा प्रश्न संच जो नविन प्लान आपल्याला मिळणार आहे त्याव्यतिरीक्त आणखीन किफायतेशीर प्लॅन आला तर पुढे आपले बिलाचं डीडक्शन होत राहील.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आपल्याला रेंज पाहिजे. आता अधिका-यांना आणि आपल्याला तोच रेट आहे. १००० रु. च्या वर येतील ते बिल त्यांनी भरायचं आहे तर आपल्याला व्होडाफोन घेतली आणि रेंज मिळालं तर प्रत्येक वेळेला अधिकारी मिळू शकतो आणि संच राहीला तर संचाची किंमत किती देणार २०० ते ५०० रु. पर्यंत देणार ते तुम्हाला ५००० रु. भाव चालू आहे तर तुम्हाला २००० रु. देणार नाही. ते तुमचे संच २००-३०० रु ला घेतील आम्ही तर डीसाईड केलेलं आहे की व्होडाफोन या कंपनीशी संपर्क साधावा आणि त्यांचा .....................

**भगवती शर्मा :-**

प्रत्येक कंपनी वेळोवेळी नविन स्कीम येते ते आपल्याला देतात.

**शशिकांत भोईर :-**

तरीपण त्यांच्याशी बारगेनींग करता आलं तर बारगेनींग करावं.

**भगवती शर्मा :-**

व्होडाफोनला आम्ही सगळे मंजूरी देत आहे. व्होडाफोन कंपनीचे मालक जे कोण असतील तर सेल्समेनला बोलावून तुम्ही बारगेनींग करुन घ्या आणि चर्चा करावी ही सभा मान्यता देत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १२५ :-**

महानगरपालिकेच्या पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांना नव्याने भ्रमणध्वनी सेवा उपलब्ध करुन देणेबाबत.

**ठराव क्र. ११५ :-**

महानगरपालिकेच्या पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांना सद्यस्थितीत रिलायन्स कंपनीची भ्रमणध्वनी सेवा पुरविण्यात येत आहे. रिलायन्स कंपनीचे नेटवर्क व्यवस्थितरित्या प्राप्त होत नसल्याने महानगरपालिकेच्या महत्वाच्या कामासंबंधी अधिकारी तसेच पदाधिकारी यांच्यामध्ये समन्वय साधता येत नाही. करिता ज्या मोबाईल कंपनीचे नेटवर्क तसेच सेवा चांगली असेल अशा मोबाईल कंपनीकडून भ्रमणध्वनी सेवा उपलब्ध करुन घेणे अत्यावश्यक आहे. वोडाफोन या कंपनीचे नेटवर्क तसेच सेवा इतर मोबाईल कंपन्यांपेक्षा खुप चांगली आहे. तरी मा. आयुक्त व सभापती स्थायी समिती यांचेशी चर्चा करुन वोडाफोन कंपनीस प्रथम प्राधान्य देऊन त्यांचेशी चर्चा निष्फळ ठरल्यास अन्य मोबाईल कंपनीची भ्रमणध्वनी सेवा पदाधिकारी / अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**नगरसचिव :-**

मा. आयुक्त साहेब, मा. सभापती साहेबांना बजेट सादर करत आहेत. तर सर्व सदस्यांनी कृपया एका साईडला यावे. प्रकरण क्र. १२६, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९५ अन्वये "अ" + "क" + "अंध व अपंग" + "महिला बालकल्याण" + "JNNURM" + "P" अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, चर्चेचा विषय घेतलेला आहे. आपण मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये सिटी सर्व्हे केला होता उत्तन, डोंगरी, या साईडला होऊ दिला नाही. त्यांची काही कारण असतील परंतु जिथे सिटी सर्व्हे झालेला आहे. तर त्यांचे नंबर देऊन तो कार्यान्वीत करावा की, त्यामध्ये लोकांच्या अडचणी आहेत काही घर गावठणमध्ये आहे त्यांचा सी.टी. सर्व्हे नं. नसल्यामुळे ते पासिंग पण करु शकत नाही ०१/०१/१९९५ पूर्वीचं कागदपत्रे सादर करायला लागते जर सीटी सर्व्हे नं. मिळाला तर गावठन मध्ये ह्याचा त्याचा नंबर आहे त्या निमित्ताने ०१/०१/१९९५ पूर्वीच केलं तरी होईल. आता तुम्ही फोटोपासमध्ये बघा जो आंबेडकर नगरमध्ये राहत होता तो भोलानगरमध्ये पण राहत आहे आणि तो अंबे माता नगरमध्ये पण राहत आहे आणि तो अंबे माता नगरमध्ये राहत होता तो पण तिकडे कुठेही कुठला वापर करतात सि.टी. सर्व्हे नं. मिळाला तर त्याचा फायदा या जनतेला होईल आणि त्यांना घर बांधण्यासाठी अडचणी येणार नाही. जे सि.टी. सर्व्हे आजपर्यंत झालेलें आहेत. डोंगरी पासून भाग वळवून त्यांना तो कार्यान्वीत करावा अशी विनंती आहे त्याबद्दल प्रशासनाने निवेदन केलं तर बर होईल.

**मा. आयुक्त :-**

मागच्या वेळेला मा. महासभेमध्ये आणि स्टँडीग कमिटीमध्ये चर्चा झाली होती त्याप्रमाणे आम्ही मिटींग ठेवली होती. मिटींगला जे अधिकारी उपस्थित होते ते तपासणी अधिकारी ६ नेमलेले आहेत त्यांची छाननी चालू आहे सर्व्हे झालेला आहे. फक्त मालकी हक्काची चौकशी चालू आहे ६ अधिकारी नेमले आहेत. झालेल्या एरीयासाठी, ते लवकरच काम पूर्ण होऊन आपल्या ताब्यात येईल.

**शशिकांत भोईर :-**

लवकर पाठपुरावा केला तर बर होईल.

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेचे मुळ बजेट सादर केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२७, वृक्षप्राधिकरण समितीने मंजुर केलेले सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना वृक्षप्राधिकरणाचे बजेट सादर केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२९, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाचे कलम ९७ अन्वये परिवहन सेवेचे सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना परिवहन समितीचे बजेट सादर केले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. १२८, शिक्षण मंडळ समितीने मंजुर केलेले सन २०१०-११ चे सुधारीत व सन २०११-१२ चे मुळ अंदाजपत्रक मा. स्थायी समितीस सादर करणे.

(मा. आयुक्त सो. यांनी मा. सभापती, स्थायी समिती यांना शिक्षण मंडळ समितीचे बजेट सादर केले.)

**लियाकत शेख :-**

सन्मा. सभापती साहेब व तसेच सर्व सन्मा. सभासद मा. आयुक्त साहेब व सर्व अधिकारी वर्ग आमच्या मंडळाच्या वतीने तुम्हाला सर्वांना दोनच विनंती आहे की, आमचे बजेट जसेच्या तसे मंजूर करण्यात यावे व आमचा निधी लवकरात लवकर वर्ग करावा अशी माझी विनंती आहे.

**मा. आयुक्त :-**

**सन्मा. स्थायी समिती सभापती श्री. स्टिवन जॉन मेंडोंन्सा सो.,** सन्मा. सदस्य, तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचारी वर्ग, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेचे सन २०१०-११ चे सुधारित व सन २०११/१२ चे मुळ अंदाजपत्रक आपणांस सादर करीत आहे. अर्थसंकल्पाबाबत आपणांस खालीलप्रमाणे निवेदन करत आहे.

(१) महापालिकेने सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात करवाढ सुचविलेली होती. ती २० फेब्रुवारीच्या आंत केली नसल्याने शासनाने करवाढीचा ठराव निलंबित केला आहे. त्यामुळे मनपाने वाढविलेले (अ) मलप्रवाह लाभ कर (ब) मनपा शिक्षण कर (क) रस्ता कर (ड) पाणीपुरवठा लाभ कर विचारात घेता, यातील अनुक्रमे (क) रस्ता कर (ड) पाणीपुरवठा लाभ कर हे दोन्ही कर महापालिकेने ठराव क्र. ३८ दि. ३०/०७/२०१० अन्वये रद्द केलेले आहेत. परिणामी मनपाचे उत्पन्न कमी झाले आहे.

(२) महापालिकेवरील कर्जाचे दायित्व पाहता ५०ग्ख्क्र पाणी योजना / श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्ग / डी. पी. रोड/ ङ.ग्र.ए. तसेच शहरात राबविण्यात येत असलेली ख्ग़्छङग् मधील मंजूर भुयारी गटार योजना रूपये ३३१/- कोटी पाहता या योजनेवरील वाढीव भार विचारात घेता मनपास ५०ऽ स्वतःचा हिस्सा रूपये १६५.५० कोटी अ रू. १६१.०० कोटी वाढीव भार लावावा लागणार आहे. यासाठी ग्ग्ङक़्क्रॠने मनपाची कर्ज परतफेड क्षमता लक्षात घेवून या योजनेसाठी केवळ २२६.०० कोटी रूपये कर्ज मंजूर केलेले आहे. या सर्व कर्जाचे दायित्व रूपये २९५.०६ कोटी इतकी आहे. त्याचा दोन सहामाही कर्जपरतफेड हप्ता रक्कम रूपये २४.९४ कोटी इतका आहे.

(३) महापालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत पाहता महापालिका मर्यादित उत्पन्नातून भांडवली विकास कामे करू शकत नाही. याचा साकल्याने विचार करून शहरासाठी २००MLD पाणी योजना सुर्या धरणातून **Public Private Partnership (P.P.P.)** तत्वावर राबविणे हाती घेतले आहे. यासाठी केंद्रशासनाचे २०% व राज्य शासनाचे २०% असे एकूण ४०% तुटीचा अर्थ भरणा **(V.G.F.)** म्हणून प्राप्त होणार असल्याने मनापाचा ४०% भाग भांडवल राहणार आहे. या पध्दतीने यापूर्वी ११६ एमएलडी व नवीन २०० एसएलडी असे मिळून ३१६ एमएलडी पाणी पूरवठा योजनेतून २४ तास पाणी पूरवठा करण्याचा मनोदय आहे. वॉलमेन चा खर्च वाचून ईलेक्ट्रीक बिल व टॅकरला लागणारे डिझेल इत्यादी मध्ये बचत होवून लोकांना पाणी साठवून ठेवावे लागणार नसल्याने शहराची पाण्यापासून उद्‌भवणाऱ्या रोगराई पासून मुक्तता होणार आहे.

पाणी उचलण्याचे परवाने महापालिकेच्या नावे असल्याने या प्रकल्पाची अंतिमतः मालकी महापालिकेची असेल. सार्वजनिक खाजगी लोकसहभागातून गुंतवणूकदाराने केलेला भांडवली खर्च ३० वर्षात पूर्ण होणार असल्याने त्यानंतर पूर्णतः मालकी हक्क महापालिकेचा राहणार आहे.

(४) मनपाचा ठराव क्र. ३२ दिनांक ३०.०७.२०१० अन्वये MRTP Act मधील कलम (३७) खाली Minor Modification करून विकास नियंत्रण नियमावलीत दुरूस्ती प्रस्तावित केलेली आहे. त्युनसार विकासक स्वतः विमुक्त यंत्रणेमार्फत ङक्क रस्ता अथवा आरक्षणाचा विकास करत असल्यास त्यास च्क़्ङ देवून रस्ता विकास/आरक्षण विकास करता येईल. परंतु मालक अनेक असल्यास अशी कामे एकाचवेळी करणे शक्य होणार नाही. म्हणून नियमात दुरूस्ती प्रस्तावित आहे. मंजुरी मिळाल्यानंतर सर्व डी.पी. रोड व आरक्षणे च्क़्ङ देवून विकसित करुन घेण्यात येणार आहे. आरक्षणाचा विकास व सर्व डी.पी.रोड ङक्क करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरीकांना चांगल्याप्रकारे सोयीसुविधा उपलब्ध होणार आहे.

(५) **BSUP प्रकल्प** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत एच्छ्द या उपक्रमामध्ये महानगरपालिका क्षेत्रातील काशी मिरा येथील जनतानगर व काशीचर्च या भागातील झोपडपट्टयांमध्ये मुलभूत सुविधांसह निवारा उपलब्ध करुन झोपडपट्टी विकास योजना प्रस्तावित करणेत आली असून त्यास केंद्र शासनाने दि.११/११/२००९ रोजी रु. २७९.५५ कोटी एवढया रकमेस मान्यता दिलेली आहे.

**प्रकल्पाचे उपांगे** -

१) सदनिका संख्या - ४१३६ , २) बालवाडी - ७ ३) समाज मंदीर - ६ ४) प्रकल्प क्षेत्रामध्ये रस्ते व गटारे बांधणे अंतर्भुत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने BSUP प्रकल्पासाठी निविदा स्विकृत केल्या असून निविदेची मंजुर किंमत ३३०.५२ कोटी आहे. त्याचा वित्तीय आकृतीबंध खालीलप्रमाणे

| केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान | मनपाचा हिस्सा | लाभार्थ्याचा हिस्सा | एकूण |
|---|---|---|---|---|
| रु. ११४.२९ कोटी | रु. ७८.९६ कोटी | रु. १२२.९३ कोटी | रु. १४.३४ कोटी | रु ३३०.५२ कोटी |

बीएसयुपी योजना वर्धनक्षम करण्याकरिता या शासन निर्णयातील तरतुदीनुसार २.५ चटईक्षेत्र निर्देशांक लागू करुन त्यातील २५ % चटईक्षेत्र निर्देशांक विक्री घटकासाठी वापरुन अतिरिक्त निधी उभारण्याची तरतुद आहे व सदर प्रस्तावास मा. मुख्य अभियंता म्हाडा यांची मान्यता मिळाली आहे.

सदर योजनेसाठी कार्यादेश निर्गमीत करण्यात आलेले आहेत. यासाठी सन २०११-१२ च्या अंदाजपत्राकात रक्कम रु. ५० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

(६) **क्रिडांगण/बगीचे खाजगी विकासकाकडून विकसित करणे** :- विकास आराखडयात ३८७ आरक्षणे आहेत. आरक्षणात क्रिडांगण/बगीचे आरक्षण आहेत. बगीच्या आरक्षण २३ जागा व क्रिडांगणाच्या ६ जागा महापालिकेच्या ताब्यात आहेत. मनापाचा मर्यादित उत्पन्नाचा स्त्रोत पाहता खाजगी सेवाभावी संस्थाकडून ही आरक्षणे विकसित करण्याबाबत ३० वर्षे वापराकरीता देण्याचा निर्णय झाल्यानुसार २३ बगीचे व ५ क्रिडांगणाकरीता निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. यामध्ये कुंपणभिंत बांधणे/ बगीच्यामध्ये पाथवे तयार करणे/ बँचेस, खेळणी बसविणे/ लॉन तयार करणे/ अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रात बगीचास आवश्यक असणारी इमारत बांधणे इत्यादी स्वखर्चाने करून रू. १/- प्रवेश फी घेऊन सदर बगीच्यांची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती करावयाची आहे. त्यामुळे मनपावर आर्थिक बोजा न पडता नागरिकांना सुविधा मिळणार आहे.

(७) **परिवहन उपक्रम** :- यापूर्वीच्या परिवहन सेवेचा विचार करता परिवहन सेवा तोटयात सुरू होती. दरवर्षी २.५० ते ३.०० कोटी रूपये मनपाचे उत्पन्नातून परिवहन सेवेस (सबसिडी) अनुदान द्यावे लागत होते. JNNURM मधील ५० बसेस तसेच P.P.P. चे तत्वावर देण्यात आलेली परिवहन सेवा यापासून मनपास रॉयल्टीपोटी प्रतीवर्षी रक्कम रूपये २.५० ते ३ कोटी मनपास खाजगी ठेकेदाराकडून प्रति कि.मी. रू. १/- प्रमाणे मिळणार आहेत. कोणत्याही प्रकारचा खर्च मनपास करावा लागणार नाही. यापासून मनापाचे दरवर्षी द्यावे लागणारे अनुदानापोटीचे २.५० ते ३ कोटी रूपयांची बचत होणार आहे. सध्या P.P.P. चे माध्यमातून २५० बसेस सुरू करण्यात येणार आहेत. त्यामुळे मनपाची १५.०० कोटीची बचत होणार असून मनपास प्रती वर्षी रु. ३.०० कोटी मिळणार आहेत. परिवहन सेवेचे स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करून आपणाकडे सादर करण्यात आले आहे.

(८) **स्थानिक संस्था कर** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात जकात कराऐवजी स्थानिक संस्था कर महाराष्ट्र शासन अधिसूचना क्र. स्था.सं.कर/२१०/प्र.क्र.३४/नवि-३४/दि. ३१/०३/२०१० नुसार लागू करण्यांत आला आहे. दि. ०१/०४/२०१० पासून या कराची अमंलबजावणी सुरू केलेली आहे. हा कर लागू केल्याने शासनाने मनपा क्षेत्रातील मालमत्तांचे विवक्षित हस्तांतरणावर १% अतिरिक्त मुद्रांक शुल्क (अधिभार) आकारून दुय्यम निबंधक कार्यालयाकडून वसुली करण्यात येत असून माहे जानेवारी २०११ अखेर ३५ कोटी रूपयांची वसुली झालेली आहे. सदरची वसुली व प्रत्यक्ष LBT द्वारे आजतागायत झालेली वसुली रु. ७०.०० कोटी असून पुढील वर्षी एकूण उत्पन्न रु. १२०.०० कोटी पर्यंन्त होईल हे गृहीत धरुन सन २०११-१२ च्या अंदाजपत्रकत LBT पासूनचे अपेक्षित उत्पन्न रु. १२०.०० कोटी इतकी तरतुद करण्यांत आलेली आहे.

(९) **पारगमन शुल्क** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेन यापूर्वी पारगमन शुल्काची स्वतः वसुली केली होती. त्यामध्ये १ वर्षात ९०.०० लाख रूपये वसुल झाले होते व कर्मचारी वर्गावरील खर्च ४५.०० लाख रूपये झाला होता. याचा विचार करून जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता महापालिका क्षेत्रातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ व घोडबंदर रोड येथे पारगमन शुल्क वसुली करीता खाजगी अभिकर्ता नेमलेला असून रक्कम रू. २२.३१ कोटी इतके उत्पन्न महापालिकेस प्राप्त होणार आहे. मनपा हद्दीत प्रवेश करणाऱ्या माल वाहतुक वाहनावर हे शुल्क लागणार नसून महापालिका क्षेत्रातून प्रवेश नाक्यावरुन निर्गमन नाक्यावर जाताना हे शुल्क आकारण्यात येणार असल्याने मनपा हद्दीतील नागरीकांवर हा टॅक्स लागणार नाही.

(१०) **नगरसेवक निधी** :- शासन निर्णयानुसार उत्पन्नाच्या २% निधी म्हणून नगरसेवक निधी रक्कम रू. ४.२५ कोटी इतकी तरतुद अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे. यातून शासनाचे प्रमाणे G.R. जी कामे सुचविण्यांत आलेली आहेत. त्यावर खर्च करणे अपेक्षित आहे.

(११) **वृक्षप्राधिकरण** :- वृक्षप्राधिकरण समितीने मंजूर केलेले अंदाजपत्रक पाहता मनपाचे उत्पन्नातून ४ कोटी ५३ लक्ष ९० हजार रूपये वृक्षप्राधिकरणास उपलब्ध करून द्यावे लागणार आहेत. यामध्ये वृक्षारोपण/दुभाजके/नर्सरी/आर.जी.मधील उद्याने विकसित करण्यासाठी रू. ३.७० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. यातून सुंदर व हरित मिरा भाईंदर बनविण्याचा माझा प्रयन्त आहे.

(१२) **शिक्षण मंडळ** :- या वर्षीपासून मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण मंडळ समितीने स्वतंत्र अंदाजपत्रक सादर केलेले आहे. यासाठी मनपाचे उत्पन्नातून रक्कम रूपये ६ कोटी ५९ लक्ष १३ हजार इतकी ५०% रक्कम शिक्षकांचे ६ व्या वेतन आयोगाने देण्यात येणारे वेतन व भत्ते तसेच फरक यासाठी द्यावे लागणार आहेत. तसेच नविन शाळा बांधकाम/प्रयोगशाळा/शालेय साहित्य खरेदी यासाठी रू. ४.२० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे मनपा हद्दीतील झोपडपट्टी तसेच गरीब कुंटूबातील विदयार्थाना सोई व सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत. हे महापालिकेवर कायदयाने बंधनकारक आहे.

(१३) **M.M.R.D.A. कडून मिरा भाईंदर शहरासाठी होणारी विकास कामे** :-

१) विरार - वसई, नायगांव येथून रेल्वे समांतर रस्ता, भाईंदर (प.) धक्का ते सुभाषचंद्र बोस मैदान व पुढे मिरारोड (प.) दहिसर लिंक रस्त्यांस जोडणे.

२) रा.म.क्र. ८ ते भाईंदर (पू.) उड्डाणपूल जंक्शन व पुढे सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत रस्त्यास दुभाजक बसविणे, सर्व्हिस रोड बांधणे.

३) मुंबई महानगरपालिका हद्दीत दहिसर (प.) पर्यंत येणा-या मेट्रो रेल्वेचा विस्तार भाईंदर (प.) पर्यंत करणे.

४) दहिसर ते घोडबंदर मार्गे ठाणे, कल्याण, भिवंडी, उल्हासनगर पर्यंत मोनोरेल जाणार असून सदर मोनोरेल मिरारोड व भाईंदर (पू.) पर्यंत आणणे.

(१४) **सब-वे (भुयारी मार्ग)** :- भाईंदर पश्चिम स्टेशन येथून भाईंदर पूर्वेकडे जाण्याकरीता सध्या ४ कि.मी. चा वळसा घालून जावे लागत आहे. त्यामुळे नागरीकांची खुपच गैरसोय होत आहे. त्यामुळे महानगरपालिकेने भाईंदर (पूर्व) व (पश्चिम) यांना जोडणारा रेल्वे खालील सबवे बांधणेचे काम (अंदाजीत खर्च रु. ४४ कोटी ) मंजूर केलेले असून सदर कामास चालू वर्षात सुरवात होणार आहे. त्यापैकी चालू वर्षात रु. १५ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर कामी रु. १५ कोटी चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे.

(१५) **कल्वर्ट बांधकाम** :- मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मिरारोड (पूर्व) नयानगर परीसर तसेच भाईंदर (पूर्व) खारीगांव, बी.पी. रोड, केबिन रोड भागात पाणी रस्त्यावर तसेच तळ मजल्यातील घरांमध्ये व दुकानात शिरून अतोनात नुकसान होत होते. सदर ठिकाणी पाणी तुंबु नये म्हणून महानगरपालिकेने भाईंदर येथील जुन्या फाटका जवळील कल्वर्टचे काम पूर्ण केले असून मिरारोड येथे कल्वर्टचे काम सुरू आहे. सदरील काम महिन्याभरात पूर्ण होईल. त्यामुळे सदर ठिकाणी पाणी तुंबणार नाही. सदर कामी एकूण रु. १४.५० कोटी खर्च अपेक्षित असून त्यपैकी रु. ७.५० कोटी एवढा खर्च झालेला आहे. सदर कामी रु. ७ कोटी सन २०११-१२ वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे.

(१६) **एकात्मीक नाले प्रकल्प** - मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे एकात्मिक नाले विकास योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल शासनास दि. २६/०५/२०१० रोजी सादर केला आहे. दि. ०६/०९/२०१० रोजी मंत्रालयात झालेल्या प्रकल्प मान्यता व सनियंत्रण समितीच्या बैठकीत या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले होते. दि. १८/०१/२०११ रोजी मा. उपमुख्यमंत्री यांचे दालनात झालेल्या बैठकीत दिलेल्या सुचनांनुसार चालू दरसुची नुसार सुधारित करुन रु.२९८.५० कोटी एवढया सुधारित रकमेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेवून प्रस्ताव पुन्हा सादर केला आहे. सदर प्रकल्पास ५० टक्के शासनाचे अनुदान व ५० टक्के कर्ज / मनपा हिस्सा असा अकृतीबंध आहे. मंजुरीची प्रक्रिया अंतिम स्तरावर असून लवकराच मंजुरी अपेक्षित आहे . यासाठी शासकीय अनुदानाअंतर्गत रक्कम रु. २० कोटी तरतुद सन २०११-१२ च्या अंदाजपत्रकात करण्यात आलेली आहे.

(१७) **साफ-सफाई व सोयी** :- मनपा ठराव क. ८६ दि. १.२.२०११ अन्वये शहरातील साफ-सफाई बाबत ५ वर्षाचा ठराव मंजूर झाला असून गल्ली बोळातून जाणा-या थ्रिव्हिलर गाडया व मोठया कॅम्पॅक्टरच्या सहाय्याने घराघरातून कचरा उचलण्यात येणार असून कच-या कुंडया मुक्त करण्यात येणार आहे. या बरोबर नाले, गटार साफ करणे व साफ-सफाईचे टेंडर काढण्यात येणार असून याची ही अंदाजपत्रकात रक्कम रु. २२.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

(१८) **कम्युनिटी सेंटर** :- मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रात सर्व सुविधांनी युक्त असे भाईंदर (प.), भाईंदर (पूर्व), मिरारोड शांतीनगर, जनतानगर काशी व मुर्धा अशा ५ ठिकाणी कम्युनिटी सेंटर बांधण्यात येणार असून त्याचा लाभ गरीब जनतेस सार्वजनिक कार्यक्रम, लग्न, वाढदिवस, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादीसाठी होणार असून याकरिता रक्कम रूपये ५ कोटी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आलेली आहे.

(१९) **मार्केट** :- मिरा भाईंदर मनपा क्षेत्रातील सर्व रस्ते फेरीवाला मुक्त करण्याचा मानस आहे. यासाठी काशी येथे मनपाचा खर्च न करता मार्केट बांधून तयार झालेले आहे. मनपाने निविदा मंजूर करून भाईंदर पूर्व येथील

मार्केटचे बांधकाम हाती घेतलेले आहे. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत विविध १० ठिकाणी मार्केट बांधण्याकरीता विकास आराखडयात मार्केट आरक्षणाकरीता फेरबदल करण्यात आलेले आहेत. याकरिता अंदाजपत्रकात रक्कम रूपये ५ कोटी इतकी तरतुद केलेली आहे. असे एकूण १२ ठिकाणी मार्केट बांधण्याची कामे पूर्ण झाल्यावर सर्व रस्ते फेरीवाला मुक्त होतील व नागरिकांना व वाहतुकीला रस्ते वापरण्याकरीता मोकळे राहणार आहेत. सर्व फेरीवाले मार्केटमध्ये शिफ्ट झाल्यानंतर महापालिकेस बाजार वसूलीपासून कायमस्वरूपी उत्पन्न मिळणार आहे. नागरीकांना उघडयावरील फळे, भाजीपाला विकत घ्यावा लागणार नाही.

(२०) **वरिष्ठ नागरीकांकरिता सुख-सोयी** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेने ॲमिनिटी ओपन स्पेसच्या तरतुदी अंतर्गत वरिष्ठ नागरिकांकरिता मौजे नवघर, मिरागांव, महाजन वाडी येथे सामाजिक केंद्र, वाचनालय, व्यायाम शाळा इ. सोयीनी युक्त अशा इमारती बांधण्याचे काम सुरू केलेले असून सदर कामावर महानगरपालिकेचा एकही पैसा खर्च होणार नाही व वरिष्ठ नागरिकांना सर्व सोयीनी अशी जागा उपलब्ध होणार आहे.

भविष्यात मुलभूत सेवा पुरविणे कठीण होऊ नये यासाठी मनपाचे स्वतःचे महसुली उत्पन्नात वाढ करण्याशिवाय गत्यंतर नाही. मनपाचे स्वतःचे उत्पन्नावरच वित्तीय संस्था कर्ज परतफेड क्षमता विचारात घेत असतात व त्यानुसार कर्ज मंजुर करत असतात. अन्यथा महापालिकेस नविन कर्ज घेणे व पूर्वीच्या कर्जाची परतफेड करणे अवघड होऊन बसणार आहे. यासाठी सर्व बाबींचा विचार व्हावा हि विनंती. उत्पन्नाच्या लेखाशिर्षनिहाय सन २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या मुळ अंदाजपत्रकात अपेक्षित जमा रु. ८८९ कोटी ९२ लाख ७४ हजार तर अपेक्षित खर्च रु. ८८९ कोटी ८७ लाख ३९ हजार असून रु. ५ लाख ३५ हजार इतक्या शिल्लकेचे अंदाजपत्रक सादर करण्यात येत आहे.

महापालिकेचा आयुक्त म्हणून काम करीत असताना मा. महापौर, मा. उपमहापौर, मा. सभापती स्थायी समिती, मा सभागृह नेते, मा. विरोधी पक्ष नेते, मा. सभापती शिक्षण मंडळ, सर्व सन्मा. सदस्य, अधिकारी व कर्मचारी वर्ग मिरा भाईंदर शहरांतील विचारवंत नागरिक या सर्वांचे मला बहुमोल सहकार्य लाभले. याबद्दल सर्वांचे मी मनःपुर्वक आभार मानतो. या अर्थसंकल्पातील उद्दिष्टे पार पाडण्यासाठी सर्वांच्या सहकार्याची मी अपेक्षा करतो.

**धन्यवाद !**

**नगरसचिव :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बजेटसाठी ३ दिवस चर्चेसाठी मा. सभापती साहेबांनी निर्देष दिलेले आहे. त्यामुळे ३ तारीख, ४ तारीख आणि ५ तारीख असे सलग प्रत्येक डीपार्टमेंट चे अधिकारी आणि आपण १६ सदस्य स्टँडीग मिटींग मध्ये जमायचं आहे त्याचे कार्यक्रम पत्रिका मी आपल्याला देतो.

**शशिकांत भोईर :-**

आता तुम्ही लगेच ३ तारखेपासून ताबडतोब मिटींग लावतो पण आम्हाला २ दिवस वेळ द्या. कारण आम्हाला पण आमच्या सदस्यांबरोबर चर्चा करायला लागेल. १ दिवसाचा अवधी आहे पण आमच्या सदस्यांना पण सांगायला लागेल ना. ५ तारखेपासून मिटींग लावली तर बर होईल.

**नगरसचिव :-**

मग, या महिन्यात २ मिटींग लावण्यात येईल बजेटची झाल्यानंतर आणखीन १ मिटींग लावाली लागेल. ५ तारखेला जर ही मिटींग लावली तर ५/६/७ मग २२-३३ नंतर मिटींग लावली जाईल.

**मा. आयुक्त :-**

मा. महासभा ३१ मार्चपूर्वी लावावी लागणार आहे. तेवढे दिवस शिल्लक ठेवूनच ही चर्चा करायला लागेल. मिटींग जेवढी उशिरा होणार तेवढी मा. महासभेला उशिर होईल. सब्जेक्ट वेगवेगळे आहे. ३ तारखेस वृक्षप्राधिकरण, पाणी पुरवठा, कर विभाग, नगररचना विभाग आणि आरोग्य विभाग या विभागांवर चर्चा करा. नंतर ४ तारखेस सार्व. बांधकाम विभाग, अतिक्रमण विभाग, अग्निशमन विभाग, जकात विभाग, स्थानिक संस्था कर आणि जाहिरात विभाग.

**नगरसचिव :-**

दि.३,४,५ हे चर्चेचे दिवस असतील आणि ७ तारखेला पून्हा बजेटचा अजेंडा काढला जाईल त्यादिवशी अंतिम विषय विषयपत्रिकेवर असतील. प्रकरण क्र.१३०, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)** मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागासाठी संगणक प्लेन व प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणे. प्रकरण क्र. १३१, **मा. आयुक्त सो. यांनी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांचे अवलोकन करणे. (संगणक विभाग)** मिरा भाईंदर महानगरपालिका मालमत्ता कर व पाणी पुरवठा विभागासाठी संगणक प्लेन व प्रिप्रिंटेड स्टेशनरी खरेदी करणे.

**शशिकांत भोईर :-**

अवलोकन आहे बरोबर आहे पण त्याचे दरपत्रक कुठे दिलेले आहे? की, किती दर होते आणि किती दर कमी केले? गोषवारा असाच दिला असं कसं चालेल.

**स्नेहा पांडे :-**

१० लाखाच्या आत आहे म्हणजे किती आहे? ७ लाख, ५ लाख किती आहे? दरपत्रक आम्हाला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापती साहेब, आता जो गोषवारा आला आहे. आपण मंजूरी देऊ पण दरपत्रक याच्यात पाहिजे ना अगोदर काय दर होते ते.

**स्नेहा पांडे :-**

आणि याच्यात एक्झॅक्ट अमाऊंट पण नाही आहे.

**भगवती शर्मा :-**

त्याशिवाय मंजूरी कशी देणार?

**स्नेहा पांडे :-**

१० लाखाच्या आत म्हणजे किती? ५ आहे की ६ लाख आहे की ७ लाख आहे. एक्झॅक्ट फिगर तरी पाहीजे ना.

**भगवती शर्मा :-**

गोषवारा अपूर्ण असल्यामुळे हे दोन्ही विषय पूढच्या मिटींगमध्ये घेण्यात यावा.

**मा. सभापती :-**

हे अवलोकनचे दोन्ही विषय पुढच्या मिटींगमध्ये घेण्यात येत आहे.

**नुर्सरत बानो :-**

मा. सभापती साहब की परवानगी से बोल रही हूँ। मा. आयुक्त साहब यह वाहतुक निरिक्षक है ना गवळी साहेब मेरी यह सुचना है की, नेक्स्ट मिटींग मे उन्हे बुलाया जाए। और उनको जो भी कार्य दिये जाते है। उसको पूरा करने के लिए उनकी जो-जो समस्या है, उनको पेश आ रही है तो उस बात पर जरा विचार विमश करनेके लिए उन्हे नेक्स्ट मिटींग मे बुलाया जाए।

**शशिकांत भोईर :-**

मागच्या मिटींगमध्ये पण हे ठरलेलं होतं आणि आपण ३ तारखेला संध्याकाळी बोलवलं त्यांची समस्या आहे आपण ठरवलेलं होते पण आपली मिटींग पुढे Postpone झाली.

**मा. सभापती :-**

३ तारखेला त्यांना बोलवून घ्या.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, परिवहन सेवेमध्ये पण जून्या बसेस चालू आहेत जर कधी अपघात वगैरे घडला तर आपल्याला घेण्याचे देणे पडतील.

**मा. आयुक्त :-**

१८ नविन बसेस आलेले आहेत. परंतु, गव्हर्नमेंटची मंजूरी मिळेपर्यंत थांबलेली आहे. २० खरेदी करुन ठेवलेले आहे. २० बसेसचे पण बॉडी बांधून झालेले आहे फक्त ते गव्हर्नमेंटची मंजूरी येईपर्यंत रोडवर आणलेलं नाही कारण मुदत संपलेली आहे.

(मा. सभापती सो. यांच्या आदेशाने प्रकरण क्र. १३० व १३१ पुढच्या मिटींगमध्ये घेण्याचे ठरले.)

**मा. सभापती :-**

महाशिवरात्रीच्या सणानिमित्त मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे मी सर्वांना हार्दिक शुभेच्छा देतो. सभा संपली असे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दु. १२.४५ वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**